
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १७ • अंक २४९
www.ramprahar.com

गुरुवार, २७ मार्च २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## यूपीआय सेवा ठप्प झाल्याने ऑनलाईन व्यवहारांवर परिणाम



**मुंबई :** देशातील विविध भागांत यूपीआय सेवा बुधवारी (दि. २६) ठप्प झाली होती. त्यामुळे नागरिकांना डिजिटल पेमेंट करण्यात अडचणी आल्या. अनेक यूपीआय युजर्सनी तक्रार केली की, त्यांचे पेमेंट फेल होत आहेत किंवा खूप संथ गतीने होत आहेत. विविध बँकांच्या ग्राहकांना यूपीआयद्वारे पैसे पाठवण्यात आणि ते प्राप्त करण्यात अडचणी येत्या होत्या. व्यापाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकांना यूपीआयद्वारे पेमेंट करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे व्यवहारांवरही परिणाम झाला. ऑनलाइन शॉपिंग आणि ॲप्सवर पेमेंट फेल झाल्याच्यादेखील तक्रारी आल्या. काही युजर्सनी म्हटले की, त्यांचे फोनपे, गुगल पे आणि पेटीएमसारखे ॲप्स योग्यरित्या काम करीत नाहीत. यूपीआय पेमेंट फेल्युअरचा सर्वाधिक फटका गुगल पेच्या युजर्सना बसला आहे. बँकिंग सेवांवरही याचा परिणाम दिसून आला.

### अंतरंग

छत्रपती संभाजीनगरमध्ये उष्माघातामुळे युवकाचा मृत्यू/२

गुढीपाडव्यानिमित्त बांबूच्या काठ्यांची मागणी वाढली/५

निमंत्रित क्रिकेट स्पर्धेसाठी 'आरडीसीए'चा संघ जाहीर/८

# चंद्र-सूर्य असेपर्यंत संविधान कोणीही बदलू शकणार नाही

## मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; आणीबाणीच्या काळातील आठवणी जागवल्या



### 'देशाचा मूळ आत्माच धर्मनिरपेक्ष'

आणीबाणीच्या काळात विरोधी पक्षाच्या नेत्यांना जेलमध्ये टाकून काँग्रेसवाले थांबले नाही, तर घटनेची ४२वी दुरूस्ती केली. भारतीय संविधानात ९९ बदल केलेत. त्यात सगळ्यात महत्त्वाचा बदल म्हणजे देशाचे पंतप्रधान, लोकसभेचे अध्यक्ष हे न्यायालयाच्या कक्षेत येणार नाहीत असे केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने इंदिरा गांधींचा दिलेला निकाल निरस्त करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा संविधान लिहिले तेव्हा भारत सार्वभौम लोकतांत्रिक गणराज्य होते, पण आणीबाणीच्या काळात त्यात समाजवादी, धर्मनिरपेक्ष हे शब्द इंदिरा गांधींनी टाकले. हे शब्द मूळ संविधानात नाहीत. या देशाचा मूळ आत्माच धर्मनिरपेक्ष आहे हे बाबासाहेबांना माहिती होते, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २६) संविधान निर्मितीचा इतिहास व त्यामधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान यावर प्रकाश टाकला. जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत, तोपर्यंत भारताचे संविधान कोणीही बदलू शकणार नाही. त्यामुळे संविधानाला कोणताही धोका नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. या वेळी त्यांनी आणीबाणीच्या काळातील कटू आठवणी सांगितल्या.

१९७१ साली काँग्रेस शासनाच्या काळात आणलेल्या मिसा कायद्याने सर्वसामान्यांचे मुलभूत अधिकार हिसकावून घेतले. संविधान बचाव तुम्ही आज म्हणता, पण आणीबाणी आली तेव्हा मुलभूत अधिकार कायद्याने निलंबित केले. अभिव्यक्ती स्वातंत्र्य काढून घेतले. राज्य कायद्याने नाही, तर हुकूमाने चालेल अशी व्यवस्था तयार झाली होती. आणीबाणी योग्य नाही असे किशोर कुमारांनी म्हटले म्हणून आकाशवाणीवर त्यांची गाणी वाजवणे बंद केले असे सांगत संविधान गौरव चर्चेवर प्रत्युत्तर देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, खरेतर आज ही बोलण्याची जागा नाही, परंतु जॉर्ज फर्नांडिस यांच्या कुटुंबासोबत जे काही झाले हे आठवलं तर आजही माझ्या डोळ्यात पाणी आणि अंगावर काटे उभे राहतात अशी त्या वेळची अवस्था होती. एक लाखाहून अधिक विरोधी पक्षातील नेते जेलमध्ये टाकले होते. माझे वडील दोन वर्ष जेलमध्ये होते. काकी शोभाताई जेलमध्ये होत्या. तुम्ही केले काय, तुमचा गुन्हा काय हे सांगायला तयार नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान गोठवून विरोधी पक्ष जेलमध्ये टाकायचे ठरवले होते.

दरम्यान, बाबासाहेबांनी राज्यांना दिलेले अधिकार केंद्राकडे देण्याचे काम ४२व्या घटना दुरूस्तीने केले. केंद्र सरकारी पोलीस, तपास यंत्रणा कुठल्याही राज्यात हस्तक्षेप करू शकतात अशी कायद्यात दुरुस्ती केली, पण आज ते असे करू शकत नाही. राज्याने परवानगी दिल्याशिवाय केंद्राच्या पोलीस दलाला राज्यात येता येऊ शकत नाही. राष्ट्रपती, राज्यपालांना अधिकार दिलेत. एखादा निर्णय ते रद्दबातल करू शकतात, मात्र ४२व्या घटना दुरूस्तीनंतर राष्ट्रपती केवळ बाहुले होते, त्यांच्याकडे निर्णय पाठवला, तर सही करूनच त्यांनी पाठवले पाहिजे अशी व्यवस्था घटना दुरूस्तीने केली होती, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी काँग्रेसवर केला.

# सुधाकर घारे यांची राष्ट्रवादीत घरवापसी!

## शेकाप नेते नारायण डामसे यांचाही जाहीर पक्षप्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व कर्जतमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुधाकर घारे यांनी आपला राजीनामा देऊन परिवर्तन विकास आघाडीच्या माध्यमातून विधानसभेची अपक्ष निवडणूक लढविली होती. या निवडणुकीत त्यांचा निसटता पराभव झाला. त्यांनी दिलेला राजीनामा पक्षाने नामंजूर केला असून घारे पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सक्रिय झाले आहेत. त्याचबरोबर शेकाप नेते व जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती नारायण डामसे यांनीही घारे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

सुधाकर घारे यांनी बुधवारी (दि. २६) राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची मुंबई येथे प्रदेश कार्यालयात भेट घेत घरवापसी केली. या वेळी शेकाप नेते, माजी सभापती नारायण डामसे, कर्जत पं.स.च्या माजी सभापती जयवंती हिंदूळा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यांचे कार्यकर्ते ९ एप्रिल रोजी एका विशेष समारंभात मोठ्या संख्येने राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत.

या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे, माजी आमदार अनिकेत तटकरे, मौलाना आझाद महामंडळाचे चेअरमन मुश्ताक अंतुले, मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, रायगड जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, महेंद्र पानसरे, महिला जिल्हाध्यक्ष उमा मुंडे, भरत भगत, अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, अंकित साखरे, दीपक श्रीखंडे आदी उपस्थित होते.

दरम्यान, घारे यांचा राजीनामा नामंजूर केला नसल्याचे पत्र मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांनी त्यांना पाठविले होते. त्यामध्ये पक्ष नेतृत्वाने चर्चा करून राजीनामा नामंजूर केला असल्याचे म्हटले असून आपण पक्षवाढीसाठी व प्रसारासाठी अनमोल कार्य केले आहे. ते प्रशंसनीय आहे. यापुढेही आपण पक्ष बळकटीसाठी व प्रसारासाठी त्याच उमेदीने कार्य करावे, असे नमूद केले आहे.

## स्नेहल जगताप यांनी 'शिवबंधन' तोडून हाती बांधले 'घड्याळ'



मुंबईतील याच कार्यक्रमात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महाडमधील नेत्या स्नेहल जगताप, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक हनुमंत जगताप, श्रेयस जगताप आदींनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला.

स्व. माणिकरावांची उणीव स्नेहल जगताप भरून काढत आहेत. विकासासाठी जो निधी लागेल तो देण्याची आमची तयारी आहे, असे सांगून अजितदादांनी जगताप व त्यांच्या कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले, तर राष्ट्रवादीच्या २६ वर्षांचे वर्तुळ आज स्नेहल जगताप व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पक्षप्रवेशाने पूर्ण झाले. राष्ट्रवादीची पूर्ण ताकद आता स्नेहल यांच्या पाठीशी आहे, असे खासदार तटकरे म्हणाले.

### निवडक

#### महादेव बेटिंग ॲप प्रकरणात सीबीआयचे ६० ठिकाणी छापे

**मुंबई :** केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) महादेव बुक बेटींग ॲप प्रकरणात बुधवारी (दि. २६) देशभरात ६० ठिकाणी छापे टाकले. त्यात छत्तीसगड, भोपाळ, कोलकाता आणि दिल्लीतील ठिकाणांचा समावेश असून ही ठिकाणे या प्रकरणात सामील असलेल्या खासगी व्यक्तींशी संबंधित आहेत. छाप्यादरम्यान अनेक डिजिटल आणि दस्तऐवजी पुरावे सापडले असून सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी ते जप्त केले आहेत.

#### कुणाल कामराला मुंबई पोलिसांचे पुन्हा समन्स

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवणारे आक्षेपार्ह गाणे सादर करणारा स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या विरोधात खार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याला समन्स बजावले होते, पण तो चौकशीसाठी हजर राहिला नाही. आता पोलिसांनी त्याला पुन्हा समन्स बजावले आहे तसेच या वेळी वाढीव मुदत देण्यासाठी नकार दिला आहे. यामुळे कामराच्या अडचणी वाढल्या आहेत.

# मिस्टर बिनने बाळासाहेबांची शिवसेना काँग्रेसच्या डस्टबिनमध्ये टाकली होती

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र

**मुंबई : प्रतिनिधी**

काही लोक मिस्टर बिन आहेत. सर्वसामान्य शिवसैनिकांना कचरा समजण्याची जी वृत्ती आहे, त्यामुळेच सगळेजण गेले. मग कचऱ्यातून जी एनर्जी निर्माण झाली त्याचा हायव्होल्टेज शॉक बसला. बाळासाहेबांची शिवसेना त्यांनी काँग्रेसच्या डस्टबिनमध्ये टाकली होती. ती आम्ही सुरक्षित बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा विधान परिषदेत बोलताना समाचार घेतला.

विरोधक दररोज सकारात्मक गोष्टींकडे, विकासाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत आहेत. संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा विरोधकांकडून नेहमी मारल्या जातात, पण संविधानावर कारभार आम्ही करत आहोत, असे म्हणत महाविकास



आघाडीच्या कार्यकाळात काय घडले याचा पाढाच उपमुख्यमंत्री शिंदेंनी या वेळी वाचला तसेच उद्धव ठाकरेंवर टीका केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मर्चंट नेव्हीच्या अधिकाऱ्याला मारताना कुठे होतं तुमच्या हातातलं संविधान? प्रदीप मोरेला मारलं तेव्हा संविधान कुठे होतं? केतकी चितळेला तुरुंगात डांबलं तेव्हा संविधान कुठे होतं? मलिष्काच्या गाण्यामुळे तुम्हाला पोटदुखी झाली तेव्हा संविधान कुठे होतं? हनुमान चालीसा म्हटली म्हणून राणा दाम्पत्याला तुरुंगात धाडलं तेव्हा संविधान कुठे होतं? खोट्या केसेस करून देवेंद्र फडणवीसांना तुरुंगात पाठवण्याचं षड्यंत्र रचलं तेव्हा कुठे होतं संविधान? उद्योजकाच्या घरासमोर बॉम्ब पेरताना कुठे होतं संविधान? वाझे हा काही लादेन नाही म्हणताना संविधान आठवलं नाही का? नारायण राणेंना अटक करताना संविधान आठवलं नाही का? कंगनाच्या ऑफिसवर बुलडोझर चालवला तेव्हा कुठे होतं संविधान? फडतूस म्हणाले त्यांच्या पायाशी लोटांगण घालताना संविधान कुठे होतं? असे तिखट प्रश्न उपमुख्यमंत्री शिंदेंनी उपस्थित केले तसेच मला जास्त बोलायला लावू नका. बात निकली तो दूर तक जाएगी, असा इशाराही विरोधकांना दिला.

# चाकूचा धाक दाखवून महिलेवर बलात्कार

## नागोठण्यातील घटना; नराधम अटकेत



**नागोठणे : बातमीदार**

चाकूचा धाक दाखवून एका महिलेवर घरात घुसून बलात्कार केल्याची घटना नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाटणसई येथे घडली आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

फिर्यादी महिला ही तिच्या घरात काम करत होती. या वेळी घराचा दरवाजा कोणीतरी वाजवला म्हणून तिने दरवाजा उघडला असता आरोपी उजागिरलाल बन्सल (मूळ रा. मध्य प्रदेश) बळजबरीने घरात शिरला व त्याने घराची आतून कडी लावून घेतली. यानंतर त्याने महिलेस चाकूचा धाक दाखवून तिच्याकडे शरीरसंबंधाची मागणी केली आणि आरडाओरडा केल्यास ठार मारेन अशी धमकी देऊन बलात्कार केला तसेच झालेला प्रकार कोणाला सांगितल्यास तुला व तुझ्या पतीला ठार मारेन अशी धमकीही दिली.

या घटनेनंतर घडलेला प्रकार पीडित महिलेने तिच्या कुटुंबियांना सांगितला व नागोठणे पोलीस ठाण्यात या प्रकरणी रितसर तक्रार नोंदवली. पीडितेच्या तक्रारीनंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची सूत्रे तातडीने फिरवून आरोपी उजागिरलाल बन्सल याला अटक केली.

# वीज पडून महिलेचा मृत्यू

**सांगली : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात अनेक चढ उतार दिसत आहेत. राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली असून सांगलीत वीज पडून एका महिलेचा मृत्यू झाला आहे.

उष्णतेच्या लाटेनंतर हवामान विभागाने सोलापूर, सिंधुदुर्ग, सांगली जिल्ह्याला अवकाळी पावसाचा अलर्ट दिला होता. त्यानुसार अवकाळी पाऊस पडत आहे. सांगलीत एक महिला सकाळी शेतामध्ये गेली असता अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. जोराचा वारा सुटल्याने ती घरी जाण्यास निघाली असता तिच्या अंगावर वीज कोसळली व यात तिचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा फटका शेतकऱ्यांना बसला असून पिके, फळबागांचे नुकसान झाले आहे.

# रेल्वे प्रकल्पातील कुंडेवहाळ बोगद्याचा ब्रेकथ्रू!

## वैतरणा ते जेएनपीटी मार्गावरील महत्त्वपूर्ण टप्पा पार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक्सप्रेस फ्रेट रेल्वे कॉन्सोर्टियम प्रकल्पांतर्गत वैतरणा ते जेएनपीटी मार्गावरील कुंडेवहाळ येथील बोगदा खोदण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा पार पडला असून बोगद्यातील सर्व लाईन टाकण्याचे व इतर काम लवकरच पूर्ण होणार असल्याचा विश्वास डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे एमडी प्रवीण कुमार यांनी बुधवारी (दि. २६) कुंडेवहाळ येथे बोगद्याच्या ब्रेक थ्रू सोहळ्यात व्यक्त केला.

कुंडेवहाळ येथील बोगदा वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या जेएनपीटी-वैतरणा सेक्शनमधील एक महत्त्वाचा भाग आहे. हा प्रकल्प जेएनपीटी ते वैतरणापर्यंत सुमारे १०२ किमी लांबीचा आहे. भारताच्या उत्तर भागाशी मालवाहतुकीचे दळणवळण सुधारण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा मानला जातो. या मार्गामुळे जेएनपीटी आणि भारताच्या उत्तरी प्रदेशातील मालवाहतुकीत मोठी सुधारणा



होणार आहे. वाहतुकीचा वेग वाढून लॉजिस्टिक्सच्या खर्चात बचत होणार होईल तसेच पायाभूत सुविधा अधिक मजबूत होणार असून उद्योग आणि व्यापारासाठी उपयुक्त ठरणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भारताच्या मालवाहतुकीच्या नेटवर्कमध्ये आश्वासक मोठी भर पडणार आहे.

टाटा प्रोजेक्ट लि. कंपनी हे काम करत आहेत, तर सबकॉन्ट्रॅक्टर म्हणून टीआयपीएल अर्थात ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रायव्हेट लि. काम करत आहे. त्या अनुषंगाने या प्रकल्पातील महत्त्वाच्या अशा कुंडेवहाळ येथील १६९ मीटर लांबीचा बोगदा खोदण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर बुधवारी कुंडेवहाळ येथे टनल ब्रेकथ्रू सोहळा झाला. या वेळी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.चे एमडी प्रवीण कुमार यांनी बटन दाबून या बोगद्याचे काम पूर्ण झाल्याचे जाहीर केले.

सोहळ्यास डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.चे चीफ जनरल मॅनेजर परमजीत सिंग, टाटा प्रोजेक्ट लि.चे उप्पलपती व्यंकट कुमार, राजकुमार शर्मा, साहिल शर्मा, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, टीआयपीएलचे डायरेक्टर एम.पी. त्यागी, महादेव यादव, प्रकाश पाटील, यल्लालिंग दिगी, कपिल कड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## बोलीभाषा कविता लेखन स्पर्धेचे शनिवारी पारितोषिक वितरण व कवितासंग्रह प्रकाशन

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२४मध्ये मराठी विभागाने प्राचार्य शंकरराव उनउने बोलीभाषा कविता लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले होते. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण व यातील निवडक कविता घेऊन तयार केलेल्या बोलीगंध या प्रातिनिधिक कवितासंग्रहाचे प्रकाशन छत्रपती शिवाजी कॉलेज येथे शनिवारी (दि. २९) दुपारी १.३० वाजता होणार आहे.

या समारंभाचे अध्यक्षस्थान रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकात दळवी भूषवणार असून प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासह रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्रा.डी.ए. माने, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात येतील व बोलीगंधचे प्रकाशन होईल, अशी माहिती छत्रपती शिवाजी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.सुभाष वाघमारे यांनी दिली.

छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ११ वर्षे प्राचार्य म्हणून काम केलेले प्राचार्य शंकरराव उनउने यांच्या स्मृती जतन करणे व त्या योगाने मराठी भाषा समृद्धीचे काम व्हावे यासाठी बोलीभाषा कविता लेखन स्पर्धा घेण्यात आली होती, तर १५ डिसेंबर २०२४ स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. आता २९ मार्च रोजी पारितोषिक वितरण होईल.

# टप्प्याटप्प्याने सर्व एसटी बसेस अपारंपरिक इंधनावर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली माहिती

**मुंबई, : प्रतिनिधी**

एस टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करण्यात येणार आहेत. एसटीच्या बसेस इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचे नियोजनअसल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.

सदस्य उमा खापरे यांनी पिंपरी–चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील प्रदूषणाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये शशिकांत शिंदे, प्रविण दरेकर, अनिल परब, अमित गोरखे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

एसटी महामंडळाकरिता ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यापैकी ४५० बसेस खरेदी केल्या आहेत. तसेच एसटीच्या सध्याच्या बसेस एलएनजीमध्ये परावर्तीत करण्यात येणार असून एलएनजी पुरवठा करण्यासाठी करारकरण्यात आला आहे.



राज्यात ईव्हीच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ईव्ही धोरण आणले आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत.

यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये ३० लाखापेक्षा जास्त किमतीच्या ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर आकारण्याचे जाहीर केले आहे. परंतु हा कर मागे घेण्याची घोषणा सभागृहात करण्यात येणार आहे. राज्यातील रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान ८० टक्के ईव्ही वाहने होतील यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढलाकी प्रदूषण कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होईल. तसेच हिंजवडी परिसरातील होणारे प्रदूषण हे मुख्यतः वाहनांमुळे होत असून यासाठी मेट्रो आणि बसेसची कनेक्टिव्हीटी सुरू करण्यात येत आहे. जास्तीत जास्त ईव्ही बसेस घेण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषण मुक्त असावी सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रिक करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमदारांनाही देण्यात येणाऱ्या वाहन कर्जावरील व्याज सवलतीही ईव्हीसाठीच देण्यात येतील. सर्व मंत्री यांची वाहनेही ईव्हीमध्ये बदलण्याचे शासनाचे नियोजन असल्याचेही सांगितले.

## 'पालकांनी मुलांशी संवाद साधण आवश्यक'

**खोपोली : प्रतिनिधी**

मोबाईल स्टेटस ठेवण्यावरून निर्माण होणारे वाद वाढत जाऊन दोन समाजात तेढ निर्माण होत असेल तर पोलीस कारवाईचा बडगा उचलला जाईल असे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी मंगळवारी खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत सांगितले .

आगामी आठवडा उत्सवाचा असून सर्व धर्मीयांचे सण येत असल्याने शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आले होते. परंतु अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी तसेच आगामी सण उत्सवाच्या काळात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून पोलीस पाटील, शांतता समिती सदस्य मोहल्ला कमिटी यांनी सावधगिरी बाळगावी असे आवाहन केले. याशिवाय मोकाट गुरांचा योग्य बंदोबस्त गुरे मालकानी करावा अन्यथा कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल असे सांगितले. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी समाज माध्यमातून वादग्रस्त स्टेटस ठेवल्यामुळे दररोज तक्रार येत आहेत त्यामुळे पालकांनी आपला मुलगा मोबाईलवर कशाप्रकारे सक्रिय आहे याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले.

## राजिप नवनियुक्त कर्मचाऱ्यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत जिल्हा परिषद अंतर्गत नवनियुक्त कर्मचारी यांचे सेवांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रशिक्षण शिबिर बुधवारी (दि.२६) जिल्हा नियोजन भवन येथे पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून नवनियुक्त कर्मचाऱ्यांना सेवा बजावताना शिस्त, अपिल, वर्तणुक, वित्तीय बाबी, ई–ऑफिस, सेवापुस्तक, रजा नियम, आर्टीफिशिअल इंटेलिजेंस या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी १०० दिवसांचा महत्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत शंभर दिवसांत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा या बाबींवर भर दिला जात आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे



यांच्या संकल्पनेतून सदर शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्धाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या हस्ते करण्यात आले. तर शिबिराच्या दुसऱ्या सत्रात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी शिबिराला भेट दिली. यावेळी सदर शिबिरात नवनियुक्त कर्मचाऱ्यांना मिळणारे प्रशिक्षण त्यांना सेवा बजावताना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. कर्मचाऱ्यांनी सर्व शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी काम करावे, असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले.

या शिबिरात शिस्त अपिल, वर्तणुक या विषयावर माणगाव पंचायत समितीच्या सहाय्यक प्रशासन अधिकारी स्नेहल मोरे यांनी नवनियुक्त कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच वित्तीय बाबी या विषयावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम,

ई–ऑफिस विषयावर माहिती तंत्रज्ञान अधिकारी आय.टी. सेल कृष्णात उथळे, सेवापुस्तक, रजा नियम विषयावर सहायक प्रशासन अधिकारी अंजली वर्तक व कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रसाद पवार, आर्टीफिशिअल इंटेलिजेंस या विषयावर जिल्हा समन्वयक (आपले सरकार), जयेश म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

## वडघर मुद्रे हायस्कूलमध्ये समुपदेशन

**माणगाव : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ,कल्याण संचलित सरस्वती विद्या मंदिर वडघर मुद्रे ता.माणगाव जि.रायगड या शाळेत सहशालेय उपक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा,सायबर गुन्हे,स्व – संरक्षण,महिला सुरक्षा,चांगला स्पर्श – वाईट स्पर्श, सामाजिक मन विचलित करणाऱ्या गोष्टींचे ज्ञान व्हावे यासाठी जाणीव व्हावी समाज प्रबोधन व्हावे याकरिता सामाजिक समुपदेशन गोरेगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांनी मार्गदर्शन केले. तसेच पोलीस नाईक रेखा मोहिते यांनीही चांगला स्पर्श– वाईट स्पर्श याविषयावर विद्यार्थ्यांनी व महिलांना मार्गदर्शन केले.भरपूर खेळावे,भरपूर अभ्यास करावा. आई वडीलांचे स्वप्ने साकार करावीत असे सांगितले.

## कल्याण, भांडुप परिमंडलात १० हजारांवर थकबाकीदारांची वीज खंडित

**कल्याण: प्रतिनिधी**

महावितरणच्या कल्याण आणि भांडुप परिमंडलात वीजबिल थकबाकीदारांचा वीजपरवठा खंडित करण्याची मोहिम अधिक तीव्र करण्यात आली आहे. मार्च महिन्यात आत्तापर्यंत या दोन्ही परिमंडलातील १० हजार १७७ थकबाकीदार लघुदाब ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडित करण्यात आला आहे. कटू कारवाई टाळण्यासाठी थकीत वीजबिले तत्काळ भरावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणची संपूर्ण आर्थिक मदार ग्राहकांकडील वीजबिलांच्या दरमहा वसुलीवरच आहे. त्यामुळे थकीत वीजबिलांच्या वसुलीला वेग देण्यात आला आहे. कल्याण परिमंडलात मार्चमध्ये आत्तापर्यंत ५ हजार ५६४ थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. यात कल्याण मंडल एक अंतर्गत १ हजार २५२, कल्याण मंडल दोन अंतर्गत १ हजार ७००, वसई मंडलात २ हजार ४०२ आणि पालघर मंडलात २१० ग्राहकांचा समावेश आहे. मार्च अखेरपर्यंत कल्याण परिमंडलातील विविध वर्गवारीतील लघुदाब ग्राहकांकडून ५३ कोटी ४ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी वसुल होणे अजून बाकी आहे.

भांडुप परिमंडलात मार्चमध्ये आत्तापर्यंत ४ हजार ६१३ थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. यात ठाणे शहर मंडल अंतर्गत १ हजार २९८, वाशी मंडल अंतर्गत १ हजार ७७९, आणि पेण मंडलात १ हजार ५३६ ग्राहकांचा समावेश आहे. ३१ मार्चपर्यंत भांडुप परिमंडलातील विविध वर्गवारीतील लघुदाब ग्राहकांकडून ७५ कोटी ९६ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी वसुल करण्याचे आव्हान आहे.

कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांना केवळ मूळ थकबाकीच्या रकमेचा एकरकमी किंवा सहा हप्त्यांत भरणा करून थकबाकीमुक्ती व पुनर्वीजजोडणीची संधी देणाऱ्या अभय योजनेला आता केवळ पाच दिवस उरले आहेत. येत्या ३१ मार्चला या योजनेची मुदत संपत आहे. दोन्ही परिमंडलामध्ये आतापर्यंत १६ हजार ५०० ग्राहकांनी जवळपास ३५ कोटी ५० लाख रुपयांचा भरणा करून थकबाकीमुक्ती मिळवली आहे.

## किसान गप्पा गोष्टी व बांबू लागवड मार्गदर्शन



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन आत्मा अंतर्गत किसान गप्पागोष्टी कार्यक्रम व बांबू लागवड मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृह पोलादपूर येथे पोलादपूर तालुका कृषि अधिकारी वैशाली फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, शितल कदम गोगावले, कृउबा समिती संचालक लक्ष्मण मोरे उपस्थित होते. महाड उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी बांबू विषयी तज्ञ मार्गदर्शक म्हणून दि बांबू सेतू भोरच्या संस्थापक अनुराधा काशीद यांनी बांबू लागवड उपयोग व विक्री या विषयी सखोल मार्गदर्शन केले. राहुल काशीद यांनी मार्केटिंग व प्रक्रिया विषयी माहिती दिली.

चंद्रकांत कळंबे यांनी आपल्या भाषणामध्ये मंत्री भरत गोगावले यांनी सर्व शेतकऱ्यांनी बांबू लागवड घ्यावी व आपले शेतामध्ये प्रगती करावी असे आवाहन केल्याचे सांगितले. संजीवनी सामाजिक संस्था महाड अध्यक्षा शितल कदम गोगावले यांनी भात पिकाबरोबर शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी बांबू लागवड व फळबाग लागवड करावी असे आव्हान केले व महाड उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे यांनी मनरेगा योजनेअंतर्गत सर्व योजनेविषयी सखोल मार्गदर्शन केले. पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी शेतकऱ्यांना मनरेगा योजनेअंतर्गत बांबू लागवड व फळबाग लागवडचे अर्ज सादर करणेविषयी आवाहन केले.

## रेशनकार्ड ई–केवायसीसाठी उरले अवघे पाच दिवस!

### ३१ मार्चची डेडलाईन, अजूनही ३१ टक्के लाभार्थी दूरच

**एकूण शिधापत्रिकाधारक : ४ लाख ५३ हजार ३९४**
**एकूण लाभार्थी : १७ लाख ५६ हजार १३२**

**अलिबाग : प्रतिनिधी**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या रेशन कार्ड धारकांसाठी ई–केवायसी करणे शासनाने अनिवार्य केले आहे. यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. तरी सर्वांनी तात्काळ ई–केवायसी करावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. लाभार्थ्यांना रेशन दुकानाबरोबरच घरबसल्या मोबाईलवरूनदेखील ई केवायसी करता येणार आहे.

धान्य वाटपात पारदर्शकता निर्माण व्हावी, म्हणून शासनाने ऑनलाईन धान्य वितरण करण्यास सुरुवात केली. जिल्ह्यात एक हजार ४४८ रास्त भाव दुकाने आहेत. या दुकानांमार्फत शिधापत्रिका धारकांना धान्य वितरीत केले जाते. ई–पॉस मशीनवर असलेल्या यादीनुसारच धान्याचे वितरण केले जाते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण (ई–केवायसी) करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत.त्यानुसार रेशनकार्डला आधार प्रमाणीकरण बंधनकारक केले आहे. आधार प्रमाणीकरण नसल्यास रास्त भाव धान्य दुकानात रेशन न देण्याचे निर्देश पुरवठा विभागाने दुकानदाराना दिले होते.

राज्यातील रेशन कार्ड धारकांना घरबसल्या ई–केवायसी करण्यासाठी ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच, जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारही शिधापत्रिकाधारकांची ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. रास्तभाव धान्य दुकानात जावून लाभार्थ्यांनी ई केवायसी करता येईल.

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये ३०.९२ टक्के लाभार्थ्यांनी अद्याप ई–केवायसी केलेली नाही. सुरुवातीला २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढवून देण्यात आली होती, मात्र नागरिकांच्या सोयीसाठी ती वाढवून ३१ मार्चपर्यंत करण्यात आली आहे. संबंधित लाभार्थ्यांनी लवकरात लवकर ही प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा त्यांना रेशनचे धान्य मिळण्यमध्ये अडचण येऊ शकते.

**लाभार्थ्यांना मेरा ई केवायसी ॲप वापरून आधार प्रमाणीकरण करता येईल. रेशन दुकानदारांनी देखील शिधापत्रिकाधारकांना सहकार्य करून सर्व लाभार्थ्यांची ई केवायसी लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. जेणेकरून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे लाभार्थी धान्यापासून वंचित रहाणार नाहीत.**

– **सर्जेराव सोनावणे**, जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड

अनेक कार्डधारकांना अंगठ्याचे स्कॅनिंग ई–पॉस मशीनवर होत नसल्यामुळे त्रास होत होता. आता त्यावर तोडगा म्हणून ई–पॉस मशीनवर डोळे स्कॅन करून ई–केवायसी पूर्ण करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी त्यांच्या जवळच्या रेशन दुकानात जाऊन लवकरात लवकर ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जे राव सोनवणे यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगरात उष्माघातामुळे युवकाचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात तापमानाचा पारा वाढत आहे. याचदरम्यान छत्रपती संभाजीनगरमध्ये उष्माघाताचा बळी गेला आहे. सोयगाव येथे एका तरुणाचा मृत्यू झाला आहे.

अमोल दामोदर बाविस्कर (वय २५) असे मृत झालेल्या तरुणाचे नाव आहे. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव (हरे) येथील अमोल बाविस्कर हा तरुण सोमवारी भरउन्हात दुपारी ३ वाजता बनोटीहून गावी जाण्यास सोयगाव तालुक्यातील निमखेडी बस स्टॉपवर आला. बराच वेळ वाट पाहूनही वाहन न मिळाल्याने उन्हाचे चटके बसू लागल्याने तो बस स्टॉपवर बसला. रात्रीही तो बस स्टॉपवरवरच झोपल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले. मंगळवारी सकाळी तो मृत्यू पावल्याचे समोर आले.

पान १ वरुन

## रेल्वे प्रकल्पातील कुंडेवहाळ बोगद्याचा ब्रेकथ्रू!




या वेळी परेश ठाकूर यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे मालवाहतूक वेगाने होईल आणि नॅशनल लॉजिस्टिक कॉस्ट कमी होईल. त्यामुळे वाहतूकदारांचा वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. टाटा प्रोजेक्ट लि. कंपनीकडे हे काम असून टीआयपीएल सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून योग्य वेगाने काम पूर्ण करीत आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे तसेच पनवेल आणि उरणमध्ये प्रकल्प होत असल्याने याचा फायदा परिसरातील नागरिकांना नक्कीच होईल, असेही त्यांनी अधोरेखित केले.

## शांतता कमिटी बैठकीत सण शांततेत साजरे करण्याचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी , बातमीदार**

माणगाव पोलिस ठाण्यात आगामी सणाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून शांतता कमिटी बैठक दि. २६ मार्च रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी बोलवली होती . यावेळीसण समारंभाच्या माध्यमातून सलोखा निर्माण होतो. कोणताही अनुचित प्रकार न घडता सण शांततेत साजरे करा असे आवाहन यावेळी माणगाव पोलिसांनी केले.

आगामी सण व उत्सव तसेच कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने धार्मिक जातीय तेढ निर्माण करणाऱ्या जातीय सलोखा हानी पोहोचवणाऱ्या राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहचविणाऱ्या एखाद्या विशिष्ट समाजाला भडकविणाऱ्या कोणत्याही पोस्ट, संदेश सोशल मीडिया द्वारे पोस्ट करू नका किंवा अशा प्राप्त झालेल्या पोस्ट शेअर करू नका. कोणत्याही घटनेच्या पार्श्वभूमी विषयी संपूर्ण पडताळणी केल्याशिवाय आणि त्याबाबत सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय अशा घटनेबाबत



सार्वजनिक रित्या किंवा सोशल मीडियावर विचार व्यक्त करू नका.

समाजामध्ये अफवा पसरू नये किंवा अफवावर विश्वास देखील ठेवू नये. जातीय सलोखा बिघडेल असे कोणतेही कृत्य करू नये. कोणत्याही धर्माच्या व्यक्तीच्या व्यक्तिगत किंवा सार्वजनिक भावना दुखावतील अशा प्रकारे स्टेटस किंवा पोस्ट सोशल मीडियावर शेअर करू नये किंवा व्हायरल करू नये.

आगामी काळामध्ये सर्व धर्मीय सण उत्सव साजरा केले जाणार आहेत. आपले राहते परिसरात जास्तीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत.वाहतुकीचे नियम पाळावेत, लहान मुलांना वाहन चालवण्यास देऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या. या बैठकीला संजय अण्णा साबळे, अस्लम राऊत, अल्ताफ धनसे, रविंद्र मोरे, शेखर गोडबोले, गोविंद कासार, ललित जैन, शांतता कमिटी सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य उपस्थित होते.

# पनवेलमधील ३२ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यात ७ डिसेंबरपासून पुढील १०० दिवसांच्या कालावधीत क्षयरोग दूरीकरण मोहीम राबविण्यात आली. क्षयरोग नियंत्रण विभागाने १०० दिवस केलेल्या कामामुळे तालुक्यातील ३२ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या, तर तालुक्यात केलेल्या ४८ हजार क्षयरुग्ण तपासणीमधून अवघे नवीन १७ नवे क्षयरुग्ण आढळले.

पनवेल तालुक्यामध्ये १०० दिवसांमध्ये ४८ हजार लोकांची क्षयरोग तपासणी करण्यात आली होती. क्षयरोग नियंत्रण विभागाने १०० दिवस केलेल्या कामामुळे तालुक्यातील ३२ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या, तर तालुक्यात केलेल्या ४८ हजार क्षयरुग्ण तपासणीमधून अवघे नवीन १७ नवे क्षयरुग्ण आढळले.

**क्षयरोगमुक्त झालेली गावे**

**देवळोली, पोसारी, जांभिवली, गुळसुंदे, कराडे खुर्द, सावळे, दिघाटी, तुराडे, केळवणे, नांदगाव, बारवई, सोमाटणे, भातन, चिखले, पोएंजे, शिरवली, मालडुंगी, वाकडी, दुंदरे, उमरोली, खैरवाडी, खानाव, पाले बुद्रुक, नितळस, चिद्रण, गव्हाण नाव्हा, तरघर, ओवळे, पारगाव, वाघिवली, वडघर**

तीन महिन्यांपासून या मोहिमेअंतर्गत विविध स्पर्धा, क्षयरुग्णांना दिल्याजाणार्या विविध शासकीय योजनांविषयी प्रबोधन व घरोघरी जाऊन क्षयरुण शोधण्याची मोहीम घेण्यात आली. आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणार्या क्षयरोगमुक्ती कार्यक्रमात सर्वांना क्षयरोगमुक्तीची शपथ दिली. निःक्षय आवाहनाद्वारे गावोगावी जाऊन क्षयरोग निदानासह प्रबोधन करण्यात आले.

यापूर्वी तीन आठवडे सलग खोकला असेल तर तपासणी केली जात होती. यापुढेही जात दोन आठवडे व क्षयरुग्णांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींची एक दिवस खोकला असेल तरीही तपासणी केली. 'लवकर निदान व त्वरित उपचार' याप्रमाणे ६० वर्षांवरील व्यक्ती, वसतिगृहे, होस्टेल, कारागृह, औद्योगिक वसाहती, सार्वजनिक ठिकाणे, वीटभट्टी व साखर कारखाने येथे क्षयरुग्ण शोधमोहीम घेतली. यातून गेल्या १०० दिवसांत अवघे १७ नवे रुग्ण वाढल्याने पनवेल तालुक्याची क्षयरोगमुक्तीकडे वाटचाल सुरू झाली आहे.

## तरुणीवर धारदार शस्त्राने हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्यालगत उभ्या असलेल्या तरुणीला घरी सोडण्यावरून झालेल्या वादानंतर दोन तरुणांनी तरुणीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची घटना नुकतीच खारघर येथे घडली होती. या घटनेत तरुणी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर डी. वाय. पाटील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी खारघर पोलिसांनी दोन हल्लेखोर तरुणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या साधियाला डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघे आरोपी अद्याप फरार असून, त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक पराग लोंढे यांनी दिली.

# राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने फिरते लोकन्यायालय व कायदेविषयक जनजागृती शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने न्याय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी फिरते लोकन्यायालय आणि कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. नेरे येथे फिरते लोकन्यायालय, तर २५ मार्च रोजी ग्रामपंचायत करंजाडे येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर पार पडले.

या उपक्रमाचा शुभारंभ पनवेल अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रवेशद्वारातून सर्व न्यायाधीशांच्या उपस्थितीत, फिरत्या लोकन्यायालयाला ग्रीन सिग्नल देऊन करण्यात आला. या दोन्ही कार्यक्रमांमध्ये निवृत्त न्यायाधीश उपाध्ये यांची विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या अमूल्य अनुभवाच्या जोरावर अनेक प्रकरणे निकाली लागली तसेच नागरिकांना न्याय व कायद्याबाबत मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून आयोजित या उपक्रमात न्यायालयीन प्रक्रियांबद्दल जनजागृती, तडजोडयोग्य प्रकरणांची सोडवणूक आणि कायद्याविषयी मार्गदर्शन यावर भर देण्यात आला. न्यायाधीश उपाध्ये यांच्या नेतृत्वाखाली फिरत्या लोकन्यायालयाने अनेक प्रकरणे निकाली काढली, तर कायदेविषयक शिबिराद्वारे नागरिकांना कायद्याच्या महत्त्वाच्या बाबी समजावून सांगण्यात आल्या.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेरे ग्रामपंचायत आणि करंजाडे ग्रामपंचायतच्या सरपंच, ग्रामसेवक आणि इतर कर्मचार्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवता आला आणि शेकडो नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळू शकला.

ॲड. इंद्रजीत भोसले, ॲड. स्वाती सोनवणे, ॲड. वकी दुसिंग,ॲड. मनीषा गायकर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर आणि विधी स्वयंसेवक शैलेश कोंडसकर यांनीही या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली.

राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारामुळे आणि स्थानिक ग्रामपंचायतींच्या सहकार्यामुळे न्याय गावागावांपर्यंत पोहोचला असून, कायदेशीर प्रक्रियांविषयीची जनजागृती प्रभावीपणे झाली आहे.

## कर्तृत्वाचा सन्मान



**पनवेल : जागतिक महिला दिनानिमित्त येथील महापालिका, लोकपरिषद आणि आश्रय सोशल फाऊंडेशन यांच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आला. या वेळी कार्यतत्पर माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.**

# महापालिकेस सहकार्य केलेल्या सामाजिक संस्थाचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

औद्योगिक वसाहतींना आवश्यक असणाऱ्या विविध योजना महापालिका देण्याचा प्रयत्न करत आहे. येत्या काळात आंतराष्ट्रीय विमानतळ, इतर उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने लागणारे कौशल्ययुक्त मनुष्यबळ देण्यासाठी महापालिका विविध प्रशिक्षणे देत आहे. तसेच सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून कंपन्यानी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले.



जागतिक स्तरावर दरवर्षी २४ मार्च हा दिवस क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यासाठी 'जागतिक क्षयरोग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून महापालिकेस सहकार्य केलेल्या स्थानिक कंपन्यांचा, संस्थाचा पालिका मुख्यालयात आज दिनांक २६ मार्च रोजी सन्मानकरण्यात आला यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, पनवेल महानगरपालिका मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने , शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

माननीय पंतप्रधान महोदयांनी सन २०२५ ला भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षीत कालावधीपेक्षा पाच वर्ष अगोदर आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मोहिम पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०७ डिसेंबर २०२५पासून राबविण्यास सुरूवात करण्यात आली होती. या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागामध्ये जसे कि झोपडपट्टी, वीटभट्टी, कामांसाठी स्थलांतरित झालेले कामगार ,बेघर, इतर सामाजिक गट, तसेच तुरुंग, वृद्धाश्रम, आश्रम शाळा , वस्तीगृह, बांधकाम स्थळावरील कामगार, इंडस्ट्रियल वर्कर यांची डिजिटल पोर्टेबल क्ष किरण मशीनद्वारे चाचण्या करण्यात आल्या होत्या.

या मोहिमेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के प्रमाणे जोखीमग्रस्त नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३३ हजार ४५० छातीचे क्ष किरण चाचण्या करण्यात आल्या. त्यातील संशयित ४ हजार ३९० जणांची क्षय रोगाची चाचणी (CBNAAT) करण्यात आली. या मोहिमे मध्ये ६०९ नवीन रुग्ण शोधण्यात आले व त्यांना मोफत उपचार चालू करण्यात आले आहेत. तसेच क्षय रुग्णांना निक्षय पोषण योजनेचाही लाभ देण्यात आला आहे.

सामाजिक जबाबदारी अंतर्गत महापालिकेस १००दिवसीय क्षयरोग मोहीमेंतर्गत स्थानिक कंपन्या जसे कि इंडियन टंकसाल मुंबई यांनी चार डिजिटल हॅन्ड हेल्ड एक्स–रे मशीन सीएसआर फंडातून उपलब्ध करून दिले. आयजी पेट्रो केमिकल, दीपक फर्टिलायझर, मिलन फार्मा इंडस्ट्रीज, बर्जर पेंट, हिन्दाल्को, एल ण्ड टी, एनएमए प्रोजेक्ट मोहीम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी योगदान केले. या सर्वांचा यावेळी आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. क्षयरोग लक्षात येण्याजोगा आजार आहे. तरीही प्रशासनास रूग्णाबाबत माहिती देणे बंधनकारक आहे.

# एआयचा वापर करून श्वानांची डिजिटल माहिती गोळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकाद्दीतील भटक्या श्वानांचे सर्वेक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून करण्यात आलेले या डिजिटल सर्वेक्षणाद्वारे मिळालेली माहिती ही भटक्या श्वानांच्या लसीकरणासाठी तसेच निर्बीजीकरणासाठी उपयोगी पडणार आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या हे सर्वेक्षण देशात प्रथमच एआय प्रणालीचा वापर करून पालिका हद्दीतील श्वानांची डिजिटल माहिती गोळा करण्यात आली आहे. या सर्वेक्षणाचा उपयोग रेबीज मुक्त पनवेलसाठी होणार असल्याचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले आहे.



इंडिकेअर एआय सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या स्टार्ट अप कंपनीच्या माध्यमातून हे डिजिटल सर्वेक्षण करण्यात आले आहे. भारतात प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम राबविले गेले आहे. या सर्वेक्षणात १९ हजार ३०७ भटके श्वान आणि ५ हजार ८० भटक्या मांजरीची नोंदणी केली आहे. भटक्या श्वानांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचा उपयोग होणार आहे. भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही माहिती उपयोगी पडणार आहे. हे महत्वपुर्ण सर्वेक्षण वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते व डॉ. मधुलिका लाड यांनी केले आहे.

या डिजीटल सर्वेक्षणातून मिळालेली माहितीचा वापर महापालिकेच्या पशु वैद्यकिय विभागाच्यावतीने भविष्यातील सूक्ष्म नियोजनासाठी करता येणार आहे. या सर्वेक्षणामुळे भटक्या श्वानाची नसबंदी झाली आहे की नाही हे कळणार आहे. या डिजिटल सर्वेक्षणात श्वान, मांजरीचा फोटो, जेंडर, वय, आरोग्याची स्थिती नमूद करण्यात आली आहे. एखाद्या व्यक्तीस भटका श्वान चावल्यास या सर्वेक्षणातील माहितीमुळे तो श्वान कोणत्या परिसरातील आहे याचा शोध घेणे सहज शक्य होणार आहे.

महापालिकेने निर्बिजीकरणाचा कार्यक्रम २०१८ पासून हाती घेतला असुन या सर्वेक्षणांतर्गत एकुण ४४ टक्के भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून असे दिसून आले की प्रौढ श्वानांची संख्या १० हजार २७० एवढी आहे. श्वान पिल्लांची संख्या सुमारे १८०० आहे. तसेच वयस्क श्वानांची संख्या १ हजार ४४० एवढी आहे. यावरून महापालिकेने हाती घेतलेला निर्बीजीकरण कार्यक्रमाचे यश दिसून येत आहे.

> **रेबीजचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने महापालिकेने केलेले सर्वेक्षण महत्वपूर्ण ठरणार आहे. तसेच भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी देखील या सर्वेक्षणाचा उपायोग होणार आहे.–**
> **–मंगेश चितळे, आयुक्त पनवेल महानगरपालिका**

# गव्हाण येथील विद्यालयाच्या उपमुख्याध्यापकपदी विलासराव लेंभे

## शशिकला पाटील पर्यवेक्षकपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या उपमुख्याध्यापक पदी विलासराव यशवंतराव लेंभे तर पर्यवेक्षक पदावर शशिकला चंद्रकांत पाटील पदोन्नतीने रूजू झाले.

विलासराव लेंबे व शशिकला पाटील यांचे विद्यालयाच्या वतीने प्राचार्य गोवर्धन गोडगे व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर तसेच ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमधील सेवकांची पदोन्नती झाली असून रायगड विभागातील सह्याद्रीनगर येथील डॉ. एन.डी. पाटील विद्यालयाचे उपशिक्षक विलासराव लेंभे यांची बढतीने गव्हाण विद्यालयाच्या उपमुख्याध्यापक पदावर नियुक्ती झाली असून जासई येथील श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेजच्या उपशिक्षका शशिकला पाटील यांची पर्यवेक्षक पदावर बढती झाली आहे.

या दोन्ही अधिकाऱ्यांच्या स्वागत व पदग्रहण समारंभास विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर,ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे,सागर रंधवे आणि इतर सेवक उपस्थित होते. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे,रवींद्र भोईर व सागर रंधवे आणि बाबुलाल पाटोळे यांनी नवनियुक्त अधिकाऱ्यांच्या स्वागतपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सागर रंधवे यांनी केले तर देवेंद्र म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले.





# वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांची मागणी वाढली

## उसाचा रस, लिंबू सरबत पिण्याकडे नागरिकांचा ओघ



**उरण : प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढल्याने होणारी अंगाची काहिली मिटविण्यासाठी नागरिक शीतपेय पिण्यास पसंती देऊ लागले आहेत. उन्हाची तीव्रता वाढल्याने उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते. त्यामुळे शरीराची तहान भागवण्यासाठी लिंबू सरबत, उसाचा रस आदींसह दुग्धजन्य थंड पेयांना मोठी मागणी वाढली आहे. एकूणच शीतपेयांना मागणी वाढली असून, लिंबू सरबत, उसाच्या रसवंतीगृहात नागरिकांची गर्दी वाढली असल्याचे चित्र शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही पाहायला मिळत आहे.

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे नागरिक हैराण होत आहेत. त्यामुळे विविध मोक्याच्या ठिकाणी थंड पेयांची दुकाने थाटली असल्याचे पाहायला मिळत आहे. उन्हापासून दिलासा मिळविण्यासाठी नागरिकांनी उसाचा रस, लिंबू सरबत व कोकण सरबत आदी थंड पेयांना पसंती दिली आहे. त्यामुळे सर्व स्टॉलवर शीतपेये हमखास मिळत आहेत. उरण पनवेल मध्ये काही मोक्याच्या ठिकाणी असलेल्या स्टॉलवर मोसंबी गाजर तसेच इतर फळांचा ज्यूस पिण्यासाठी नागरिक मोठी गर्दी करत आहेत. तर बच्चे कंपनी कालाखट्टा, कच्ची कैरी, मिल्क शेक तसेच बर्फाचा गोळा खाण्याचा आनंद घेत आहेत.

शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही रसवंतीगृहे थाटली गेली आहेत. चिरनेर येथील रसवंती गृहाच्या मालक संग्राम गोंधळी व त्यांची पत्नी या मागील कित्येक वर्षांपासून उसाचा रस विकण्याचा व्यवसाय करीत आहेत. त्यांनी सांगितले की आम्ही गेले कित्येक वर्ष शेतात उसाचे पीक घेत आहोत. त्यामुळे दररोज ऊस तोडून ग्राहकांना थंडगार ताजा उसाचा रस प्यायला देतो. आमच्या दुकानात उसाचा ताजा रस मिळत असल्यामुळे ग्राहकांची मोठी गर्दी होत असते. पावसाला सुरुवात होईपर्यंत आमचे रसवंतीगृह सुरू असते. अशी माहिती संग्राम गोंधळी यांनी दिली.

# मोरा येथे साई मंदिराचा वर्धापन सोहळा

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण शहरातील मोरा येथील श्री साई दरबार मंदिरात रविवार (दि. ३० ) मार्च रोजी गुडीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर वर्धापन दिन सोहळा साजरा करण्यात येणार आहे .मंदिराच्या अध्यक्षा गं.भा. विद्या गणराज कोळी यांनी सांगितले. सकाळी ६.३० वाजता श्रींना मंगल स्नान व अभिषेक,७.३० वाजता आरती ,१०.३० वाजता भजनाचा कार्यक्रम,दुपारी १२ वाजता आरती व भजन,दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद,सायंकाळी ७.३० वाजता आरती, रात्री ९.३० वाजता पालखी मिरवणूक आदी कार्यक्रम होणार आहेत तरी भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा अशी विनंती करण्यात आली आहे .



संपादकीय

## अमेरिकी शिक्षण अवघड?

गेल्या वर्षी अमेरिकेच्या राजदुतांनी भारतीय विद्यार्थ्यांना अमेरिकी शिक्षणासंबंधीच्या मेळाव्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन समाजमाध्यमांवरून केले होते. अमेरिका ही संधींची भूमी असल्याचा त्यांचा सूर होता व भारतीय विद्यार्थीही वर्षानुवर्षे अमेरिकेकडे त्याच दृष्टीने पाहात आले आहेत. परंतु अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या राजवटीत अमेरिकी शिक्षणाचे भारतीय विद्यार्थ्यांचे स्वप्न अधिक अवघड होण्याची चिन्हे आहेत.

**गेली अनेक दशके भारतीयांनी अमेरिकेत शिक्षण व नोकरीसाठी जाऊन मोठे यश संपादित केले आहे. अमेरिकेतल्या तंत्रज्ञान, वैद्यकीय व शिक्षण या तिन्ही क्षेत्रांमध्ये भारतीयांनी आपले प्राविण्य सिद्ध केले आहे. अमेरिकेत आजच्या घडीला भारतीय समाजाची उच्चविद्याविभूषित व सर्वाधिक उत्पन्न गटातला समाज म्हणून गणना होते. परंतु राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकी नागरिक नसलेल्यांच्या अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना अमेरिकेचे नागरिकत्व देणे बंद करण्यात येत असल्याचा कार्यकारी आदेश जारी केला आणि एकंदरच भारतीयांच्या 'अमेरिकेतील आयुष्याच्या स्वप्ना'ला धक्का बसणे सुरू झाले. अमेरिकेतील स्थलांतरित भारतीयांपैकी एच-१बी व्हिसाधारक व ग्रीनकार्डचे अर्जदार यांच्यावर या आदेशाचा परिणाम झालाच आहे. आता अमेरिकेच्या धोरणांना विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातून बाहेर पाठवण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या कारवाईमुळे तिथे शिकत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांमध्ये तणावाचे वातावरण आहे. पूर्वी तेथील निरनिराळ्या हक्कविषयक आंदोलनात वा अन्य एखाद्या प्रश्नासंबंधीच्या आंदोलनात भारतीय विद्यार्थी मोकळेपणाने सहभाग घेत. परंतु आता तसे करणे किंवा कुठल्याही सरकारी धोरणाविरोधात बोलणेही धोकादायक ठरू लागले आहे. त्याशिवाय, अमेरिकेचे अध्यक्ष स्थलांतरासंदर्भात कधीही कोणताही आदेश देऊ शकतात अशी परिस्थिती आता तेथे आहे. त्यामुळे सतत एक प्रकारच्या अनिश्चिततेचा ताण सहन करणे तेथील भारतीय विद्यार्थ्यांना भाग पडते आहे. विद्यार्थ्यांवर प्रवासबंदी लादण्यात आल्याचीही चर्चा असल्याने विद्यार्थी सुटीत मायदेशी येण्यासही घाबरत आहेत. परत अमेरिकेत प्रवेश नाकारल्यास काय करायचे याची भीती अनेकांना वाटते आहे. अमेरिकेचे अन्य देशांतून येणाऱ्या स्थलांतरितांविषयीचे धोरण आता स्वागत करण्याचे नाही असे चित्र तेथे निर्माण झाले आहे. त्यामुळे भारतातून शिक्षणासाठी तिथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात आपल्याला व्हिसा मिळेल का नाही? तिथे मोकळेपणाने जगता, प्रवास करता येईल का नाही, एखाद्या विषयावर मोकळेपणाने लिहिता-बोलता येईल का नाही याविषयी बरीच साशंकता निर्माण झाली आहे. अनेकांवर मोठ्या स्टुडंट लोनचा ताणही आहेच. या साऱ्यामुळे तेथील विद्यापीठांमधील स्थलांतरित विद्यार्थ्यांची संख्या कमी होईल की काय अशी भीती अमेरिकी विद्यापीठांतील शिक्षण तज्ज्ञही व्यक्त करत आहेत. या विद्यार्थ्यांच्या शिकवणी शुल्कावरच ही विद्यापीठे अवलंबून असतात. ट्रम्प प्रशासनाने फेडरल संशोधन निधीही कमी केला आहे. या साऱ्याचा परिणाम तेथील शिक्षण जगतावर होत असून अमेरिकेत जाऊन उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न अनेक वर्षे उराशी बाळगलेले भारतीय विद्यार्थी त्यामुळे धास्तावून गेले आहेत. स्थलांतरित विद्यार्थीच काय अमेरिकेतील अनेक एच-१बी व्हिसा धारक व त्यांचे कुटुंबियही सध्याच्या अनिश्चिततेने हबकून गेले आहेत. उच्च शिक्षणासाठी आजवर भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेला सर्वाधिक पसंती दिली आहे. गेल्या वर्षीही परदेशी शिक्षणासाठी देशाबाहेर गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी २७ टक्के विद्यार्थी अमेरिकेला गेले होते. परंतु आता मात्र तिथल्या बदललेल्या परिस्थितीत भारतीय विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय या निवडीसंदर्भात संभ्रमात आहेत.**

# अभिनेते व गायक भार्गवराम आचरेकर

मराठी संगीत रंगभूमीवरील गायक-नट म्हणून गाजलेल्या भार्गवराम भिकाजी आचरेकरांचा जन्म कोकणातील मालवण तालुक्यातील आचरे या गावी झाला. भार्गवरामांचा १९२५ च्या आसपास ललितकलादर्शमध्ये प्रवेश झाला.

या कंपनीत त्यांचे संगीत व अभिनयाचे शिक्षण सुरू झाले. सुरुवातीला ते छोट्या-मोठ्या स्त्री-भूमिका व इतर कामेही करत. ललितकलादर्शच्या अनेक नाटकांतून त्यांनी कामे केली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी लेख..



भार्गवराम यांनी ललितकलेत बारा वर्षे काढली. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा', 'पुण्यप्रभाव', 'कृष्णार्जुन युद्ध', 'शिक्का कट्यार', 'सोन्याचा कळस', 'वधूपरीक्षा' इत्यादी ललितकलादर्शच्या नाटकांतून त्यांनी विविध भूमिका केल्या. त्यांना १९३७ साली कंपनीच्या दुरवस्थेमुळे पेंढारकरांनीच गावी जायला सांगितले. त्यांनी १९४०-४१ च्या सुमारास स्वत:ची 'ललितकला संवर्धक' ही कंपनी काढली. भार्गवरामांनी या कंपनीच्या 'संगीत सौभद्र'(कृष्ण), 'मानापमान' (धैर्यधर), 'पुण्यप्रभाव' (भूपाल) या नाटकांतून पुरुष-भूमिकाही समर्थपणे साकारल्या. आर्थिक जम न बसल्यामुळे ही कंपनीही बंद करावी लागली.

पुढे गंगाधरपंत लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीच्या नाटकांतूनही त्यांनी भूमिका केल्या. त्यांच्या 'विद्याहरण' या नाटकातील कच, 'प्रेमसंन्यास'मधील जयंत, 'सौभद्र'मधील अर्जुन या भूमिका विशेष गाजल्या. याच दरम्यान भार्गवराम विवाहबद्ध झाले व पुण्यात स्थायिक झाले. दामुअण्णा मालवणकरांच्या 'प्रभाकर नाट्यमंदिर' तसेच 'भारत नाट्यकला' या काही नाट्यसंस्थांतूनही भार्गवरामांनी काम केले. भार्गवरामांनी जुन्या नाटकांबरोबरच 'लग्नाची बेडी' (पराग), 'उसना नवरा' (गिरीश) अशा काही नव्या नाटकांमधूनही भूमिका केल्या.

नाटकाबरोबरच शास्त्रीय संगीताच्या बैठका, गायनाच्या शिकवण्या, आकाशवाणीवरील कार्यक्रम असे उपक्रम चालू होते. जुन्या नाटकांचा जमाना संपत आला होता. नव्या संगीत नाटकांचे युग सुरू झाले. 'नाट्यसंपदा'चे १९६७ साली 'कट्यार काळजात घुसली' हे संगीत नाटक आले. या नाटकाद्वारे भार्गवराम आचरेकरांचे वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी संगीत रंगभूमीवर पुनरागमन झाले. या नाटकात त्यांनी पं. भानुप्रसादचे काम केले. अतिशय छोटी भूमिका असली तरी भार्गवरामांचे काम आणि गाणे प्रेक्षकांच्या मनावर ठसले. या नाटकातील 'दिन गेले भजनावीण' हे पद व यमनमधील 'तराण्यां'तून त्यांच्या गाण्याचा कस दिसतो. 'कट्यार'च्या जवळजवळ ५०० प्रयोगांतून त्यांनी काम केले. ललितकलादर्शच्या हीरक महोत्सवी वर्षात १९६८ साली 'सौभद्र' या नाटकातून त्यांनी श्रीकृष्णाची भूमिका साकारली होती.

भार्गवरावांचा आवाज वजनदार आणि गाणे कसदार होते. ते सातत्याने गायनाची मेहनत करत. त्यांना १९८३ साली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे त्यांचा सन्मान करून पुरस्कार देण्यात आला. पुणे महानगरपालिकेतर्फे 'बालगंधर्व' पुरस्कार (१९९६); अखिल महाराष्ट्र नाट्य परिषद, सांगलीतर्फे पुरस्कार (१९८९); याशिवाय मराठी रंगभूमी, पुणे; कालनिर्णय, मुंबई व अण्णा कराळे पुरस्कृत 'संगीत सूर्य केशवराव भोसले' पुरस्कार आदी पुरस्कारांचे ते मानकरी होते. त्यांचे वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी पुण्यात निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# हिंदी चित्रपट अभिनेत्री प्रिया राजवंश

प्रख्यात बॉलिवूड अभिनेत्री प्रिया राजवंश तिच्या सौंदर्यासाठी मनोरंजन विश्वात ओळखली जायची. तिचे फिल्मी करीअर जितके चर्चेत राहले त्यापेक्षाही जास्त तिचे वैयक्तिक आयुष्य गाजले. अभिनेते देव आनंद यांचे बंधू चेतन आनंद यांच्यासह त्या लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहत होत्या. २७ मार्च २००० रोजी वयाच्या ६३व्या वर्षी प्रिया राजवंश यांची गळा दाबून हत्या करण्यात आली. चेतन आनंद यांच्या मुलांना प्रिया राजवंश हत्या प्रकरणात अटक करण्यात आली होती.

प्रिया राजवंश यांचे मूळ नाव वीरा सुंदर सिंग. त्यांचा जन्म ३० डिसेंबर १९३६ रोजी सिमल्यामध्ये झाला. वडिलांच्या कामामुळे पुढे त्या लंडनला गेल्या लंडनच्या एका फोटोग्राफरने काढलेला त्यांचा फोटो हिंदी फिल्म इंडस्ट्रीत पोहचला. १९६२मध्ये ठाकूर रणबीर सिंह यांनी प्रिया यांचा फोटो पाहिला. हा फोटो त्यांनी चेतन आनंद यांना दाखवला. प्रिया राजवंश यांचा फोटो पाहून त्यांनी प्रिया यांना हकीकत सिनेमाची ऑफर दिली.



चेतन आनंद आणि प्रिया यांच्या वयात तब्बल २२ वर्षांचे होते. प्रिया त्यांच्यापेक्षा खूप लहान होती. चेतन आनंद यांच्याच सिनेमात काम करण्याचा प्रियाने निर्णय घेतला होता. चेतन आनंदसुद्धा प्रियाशिवाय दुसऱ्या अभिनेत्रीला सिनेमात घेत नव्हते. प्रिया चेतन यांना स्क्रिप्टिंग आणि पोस्ट प्रॉडक्शनच्या कामातसुद्धा मदत करायची. यावरुन लोकांचा अनेकदा चेतन यांचा वाददेखील व्हायचा. एक काळ असा आला, जेव्हा प्रिया आणि चेतन लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहून लागले होते. १९६४ ते १९८६ अशी सलग बावीस वर्षे हिंदी सिनेमांमध्ये अभिनय करणा-या प्रियाला लोक चेतन आनंद यांच्या दुसऱ्या पत्नीच्या रुपात बघू लागले होते. त्यांचे अभिनेते राजकुमार यांच्यासोबत हीर रांझा, हिंदुस्थान की कसम, तसेच हसते जखम, राजेश खन्नासोबतचा कुदरत, देव आनंदसोबतचा साहेब बहादूर असे अनेक चित्रपट गाजले. १९८५मध्ये आलेल्या हाथोंकी लकीरे या चित्रपटानंतर त्या मनोरंजन विश्वापासून दूर गेल्या.

१९९७मध्ये चेतन आनंद यांचा मृत्यू झाला. त्यानंतर चेतन यांच्या मालमत्तेचा काही भाग प्रिया राजवंश यांच्याही वाट्याला आल्या. मात्र यामध्ये चेतन आनंद यांच्या पहिल्या पत्नीपासून झालेली मुलंही भागीदार होते. यातुन प्रिया राजवंश यांचे चेतन आनंद यांचे पुत्र केतन आनंद आणि विवेक आनंद यांच्याशी वाद होत होते. २७ मार्च २००० रोजी जुहू भागातील चेतन आनंद यांच्या रुईया पार्क बंगल्यात प्रिया राजवंश यांची गळा दाबून हत्या करण्यात आली होती. चेतन आनंद यांचे पुत्र केतन आनंद आणि विवेक आनंद यांना पोलिसांनी हत्या प्रकरणात अटक केली होती.

(साभार : इंटरनेट)



बदलते तंत्रज्ञान

## स्मार्टफोन सर्व एकतोय, या मार्गांनी सुरक्षित रहा

तुम्ही जर स्मार्टफोन वापरत असाल तर तुम्हाला कधी कधी वाटत असेल की तुमचा फोन तुमच्या सर्व गोष्टी ऐकतोय. तुम्ही ज्या ज्या गोष्टी बोलता त्याविषयीच्या गोष्टी आपल्याला जाहिराती किंवा सोशल मीडियावर येत असतात. या स्मार्टफोनमुळे आता आपली गोपनीय माहिती सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.



अनेक वेळा आपण स्मार्टफोनमध्ये इन्स्टॉल केलेल्या ॲप्सना कॅमेरा, मायक्रोफोन आणि स्टोरेजचा ॲक्सेस देतो. असे केल्याने, हे ॲप्स आपल्या प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवतात. अशा परिस्थितीत, स्मार्टफोनमध्ये असलेल्या ॲप्सना फक्त आवश्यक परवानग्या देणे महत्वाचे आहे. अनावश्यक ॲप्सना परवानग्या देऊ नका.

तुमची हेरगिरी करण्यासाठी फोन कॅमेरा आणि माइकचा वापर केला जातो. जर तुमच्या फोनचा कॅमेरा किंवा माइक कोणत्याही गरजेशिवाय सक्रिय केला असेल तर तुम्ही तो शोधू शकता. जेव्हा जेव्हा फोनचा कॅमेरा किंवा माइक चालू असतो तेव्हा स्क्रीनवर हिरवा दिवा चमकत असतो.

तुमच्या स्मार्टफोनवर इंस्टॉल केलेल्या ॲप्सच्या परमिशन मॅनेज करण्यासाठी तुम्हाला फोनच्या सेटिंग्ज मेनूमध्ये जावे लागेल. यानंतर, तुम्हाला प्रायव्हसी अंतर्गत परमिशन मॅनेजरमध्ये जाऊन ॲप परवानग्या मॅनेज कराव्या लागतील.

येथे तुम्ही मायक्रोफोन, कॅमेरा आणि लोकेशन यासारख्या ॲपला कोणता ॲक्सेस देण्यात आला आहे ते पाहू शकाल. यात तुम्ही मजबूत गोपनीयता ठेवण्यासाठी, आपण फक्त आवश्यक असलेल्या ॲप्सना परवानगी दिली पाहिजे.

स्मार्टफोन कंपन्या दर महिन्याला किंवा नियमित अंतराने त्यांच्या उपकरणांसाठी सुरक्षा अपडेट्स देत असतात. यासोबतच, फोनमध्ये इंस्टॉल केलेले ॲप्स वेळोवेळी अपडेट करत रहा. तुमचा फोन अपडेटेड ठेवल्याने तुमची सुरक्षा मजबूत होते आणि तुमचा फोन स्पायवेअर आणि मालवेअरपासून सुरक्षित राहतो.

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये गुगल असिस्टंट, सिरी किंवा अलेक्सा सारखे व्हॉइस असिस्टंट वापरत नसाल तर ते बंद ठेवा. व्हॉइस असिस्टंट बंद ठेवण्यासाठी, सेटिंग्जमध्ये व्हॉइस असिस्टंटवर जा आणि ते बंद करा. यामुळे गरज असेल तेव्हाच फोनचा मायक्रोफोन चालू होईल.

# पहिला अंतराळवीर युरी गागारिन

पृथ्वीच्या वातावरणाचे कवच भेदून अंतराळात जाण्याचे व अंतराळातून पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याचे तेव्हा अशक्य वाटणारे आव्हान सिद्ध करून दाखवण्याची कामगिरी तेव्हाच्या सोविएत युनियनमधील अंतराळ शास्त्रज्ञांनी १९६१ साली आजच्या दिवशी करून दाखवली. याच दिवशी युरी गागारिन हा सोविएत हवाई दलातील वैमानिक जगातील पहिला अंतराळवीर ठरला.



'वोस्तोक' या अंतराळयानातून युरीला अंतराळात पाठवण्यात आले व अवघ्या वीस मिनिटांत त्याच्या अंतराळयानाने पृथ्वीला प्रदक्षिणा घातली. सारे जग आश्चर्याने स्तंभित झाले. त्यानंतर अमेरिका व रशियाने अंतराळ संशोधनात केलेली कामगिरी जगजाहीर आहे. युरी गागारिनचे पृथ्वीवर परतल्यानंतर जगभर स्वागत व सत्कार झाले. त्याला 'हिरो ऑफ सोविएत युनियन' हा तेव्हाचा सर्वोच्च किताब प्रदान करण्यात आला.

युरी त्याच वर्षी भारताच्या दौऱ्यावर आला. तेव्हा तेव्हाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी त्याचे स्वागत केले. नंतर त्याचा मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर जंगी सत्कार करण्यात आला. त्यावेळी युरीला याचि देहि याचि डोळां पाहिल्याचे मला अद्याप स्मरते.

नंतर त्याने सोविएत अंतराळ प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षक म्हणून काम केले. त्याला पुन्हा अंतराळात प्रवास करण्याची अतीव इच्छा होती. पण ती पूर्ण झाली नाही.

निमित्त

२७ मार्च १९६८ रोजी जेट विमानाच्या एका छोट्या अपघातात युरी गागारीनचे निधन झाले, तेव्हा सारे जग हळहळले.

युरी अंतराळात झेपावण्याच्या चार वर्षे आगोदर सोविएत युनियनने आपल्या स्पुटनिक-२ या अंतराळयानातून लायका या कुत्रीला अंतराळात पाठवले होते. अंतराळात जाणारी ती पहिली सजीव प्राणी ठरली. दुर्दैवाने स्फुटनिक-२च्या उड्डाणानंतर काही तासांतच यानातील तपमानाचे नियंत्रण बिघडल्याने लायका मरण पावली. स्फुटनिक किंवा लायका दोघेही केव्हाही परतले नाहीत. तिची आठवण मात्र आज कुणालाही नाही.

युरी गगारिनने १९६१ साली पृथ्वीची प्रदक्षिणा केली. त्यांच्या या उड्डाणाने जगाच्या पूर्व आणि पश्चिम देशांत अंतराळातील स्पर्धेची शर्यत सुरू केली, मात्र एका विमान अपघातात गागरिन यांचा मृत्यू झाला. आज त्यांना जाऊन पन्नास वर्षे होत असली तरी त्यांच्या अपघाती मृत्यूच्या भोवती असलेले रहस्यमय वलय दूर होऊ शकलेले नाही.

नव्या विमानाची चाचणी घेत असता हा अपघात झाला. कर्नल लाडिमीर सर्जीएविच सवोगीन विमान चालवत होते. तेही अपघातात मरण पावले. युरी गागारिन यांच्या मृत्यूसंबंधी त्याच्या अपघाताला धरून तीन कथा सांगितल्या जातात. रशियन इतिहासकार ग्लुस्को यांच्या मते, त्यांच्या अपघाती मृत्यूची चौकशी अहवालाच्या तब्बल २९ मोठे ग्रंथ बनतील इतका तपशील असूनही त्यातील तपशील पूर्णतः स्पष्ट होत नाहीत.

५० वर्षापूर्वी विमान अपघातात मृत्यू येण्याआधी युरी गागारिन सोव्हिएट रशियाचे नॅशनल हिरो म्हणून ओळखले जात होते. तरीही त्याच्या मृत्यूची माहिती कळूनही त्याबद्दल गूढ कथा आणि सिद्धांतांमध्ये उमटत राहिली.

गगारिनचे शव दुसऱ्या दिवशी सापडले होते. सोव्हिएट स्पेस इंडस्ट्रीचा अभ्यास करणारे एक इतिहासकार अलेक्झांडर ग्लुशकोने म्हटले आहे की, गागारिनच्या अपघाती मृत्यूची चौकशी अहवालाचे जे अधिकृत २९ खंड होते, ते तेव्हा कधीही प्रकाशित झाले नाहीत.

बातमीतील बात




आरोग्य प्रहर

## केस धुण्यासाठी गरम पाणी वापरू नये

केस धुण्यासाठी गरम पाणी वापरणे अत्यंत हानीकारक ठरू शकते, कारण ते केसांचे निर्जलीकरण करते आणि त्यांना रुक्ष, कोरडे आणि कमकुवत करते. गरम पाण्यामुळे केसांची मुळेदेखील खराब होतात, त्यामुळे ते फुटतात. दुसरीकडे थंड पाणी केसांसाठी सर्वोत्कृष्ट आहे, कारण ते केसांच्या मुळांना कोणत्याही प्रकारे नुकसान पोहचवत नाही आणि त्याऐवजी त्यांची देखभाल करते. थंड पाणी प्रत्येकासाठी सोयीस्कर नसल्यामुळे ते कोमट वापरू शकतात, पण गरम पाणी नक्कीच वापरू नये.



केस धुताना सुरुवातीला गरम किंवा कोमट पाणी वापरल्यास केसांची मुळे उघडतात. टाळू व केसांचा तेलकटपणा काढून टाकण्यासाठी शॅम्पू प्रभावीपणे काम करण्यास मदत करतात, पण शॅम्पू केल्यानंतर थंड किंवा साधे पाणी वापरणे आवश्यक असते, जेणेकरून केसांवरील कंडिशनर किंवा हेअरमास्क व्यवस्थित धुतला जाईल आणि केसांच्या मुळांना पुन्हा बंद होण्यास मदत होईल. त्यामुळे त्यांचा ओलावा टिकून राहील आणि रुक्षपणा कमी होईल तसेच तुमच्या केसांना चांगली चमक येईल.

तेलकट केस रोज धुणे सुरक्षित आहे, त्यामुळे तुमच्या टाळूवरील बुरशीजन्य त्वचासंसर्ग कमी करतो तसेच केसांमधील कोंडा कमी करतो, पण जेव्हा तुम्ही तेलकट केस धुता तेव्हा पीएच बॅलन्स करणारा शॅम्पू व केसांच्या टोकांना कंडिशनर वापरणे अत्यंत आवश्यक आहे.

काही लोकांचे केस जन्मत:च कोरडे असतात तर काही लोकांचे केस रंगविल्यामुळे किंवा स्ट्रेटनिंग करण्यामुळे खराब होतात. कोरडे केस सल्फेट फ्री शॅम्पूने आठवड्यातून दोनदा धुतले पाहिजे. हा शॅम्पू केसांच्या नैसर्गिक तेलाचे संरक्षण करतो आणि केस आणखी कोरडे होणे टाळतो. केसांना शॅम्पू केल्यानंतर प्रत्येक वेळी हेअर मास्क वापरा, जो केसांना नैसर्गिक तेल पुरवितो आणि केसांना पोषण करण्यासाठी त्यांचा अर्क मागे सोडतो. कुरळ्या केसांना सुळसुळीत आणि हायड्रेट ठेवण्यासाठी खूप जास्त काळजी घ्यावी लागते. कुरळ्या केसांची व्यवस्थित काळजी न घेतल्यास केसांचा खूप गुंता होऊ शकतो आणि दिवसभर त्यांना सांभाळणे कठीण होऊ शकते. कुरळ्या केसांना सौम्य सल्फेट फ्री शॅम्पूने आणि चांगला हायड्रेटिंग कंडिशनर वापरून आठवड्यातून दोन-तीन वेळा धुतले पाहिजे. कुरळ्या केसांना खूप ओलावा पुरविण्याची गरज असते.

# कर व पाणीपट्टी न भरल्यास कारवाई करण्याचा श्रीवर्धन पालिकेचा इशारा

**श्रीवर्धन : बातमीदार**

ब्रिटिश काळात श्रीवर्धन नगर परिषदेची स्थापना करण्यात आली होती. सध्या श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढल्याने श्रीवर्धन नगरपरिषदेने देखील पर्यटन वाढीसाठी विविध उपयोजना आरंभ केल्या आहेत. तसेच शहरातील नागरिकांना चांगले रस्ते, पिण्याचे शुद्ध पाणी, पथदिवे, त्याचबरोबर शिक्षण यासाठी देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे.

मात्र शहरातील नागरिकांकडून कर भरणा करण्यासाठी चुकारपणा करण्यात येत असल्याचे पाहायला मिळत आहे. नगरपरिषदेची आत्तापर्यंत कर वसुली जवळजवळ ६० ते ६५ टक्क्यापर्यंतच झाली असल्याचे पाहायला मिळत



आहे. श्रीवर्धन नगरपरिषद हद्दी मध्ये पाच हजाराहून जास्त मालमत्ताधारक आहेत. तर जवळजवळ दोन हजारापेक्षा जास्त नळ जोडणी धारक आहेत. नगरपरिषदेकडून चौका चौकामध्ये कर वसुलीसाठी उद्घोषणा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी बॅनर लावून नागरिकांना कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

शहरातील नागरिकांनी वेळेवर कर भरणा न केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल. त्याचप्रमाणे नळ जोडणी देखील कापण्यात येईल व नागरिकांना नगरपरिषदेकडून हवी असलेली कोणतीही अधिकृत कागदपत्रे कर भरल्याशिवाय मिळणार नाहीत. असे स्पष्ट आवाहन नगर परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

मार्च महिना संपण्यासाठी केवळ काही दिवसच शिल्लक आहेत

नगरपरिषदेकडून कर वसुलीसाठी सात ते आठ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही पथके घरोघर जाऊन नागरिकांना कर भरणे बाबत आवाहन करीत आहेत. तसेच जे नागरिक कर देतील त्यांना रीतसर पावत्या देऊन कर वसूल करत आहेत. श्रीवर्धन नगरपरिषदेकडून मागील वर्षीच जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. परंतु नगरपरिषदेने अद्याप शुद्ध पाणीपुरवठा करण्याबाबत कोणत्याही प्रकारची जास्त कर आकारणी केलेली नाही. सध्या जुन्या आकारणी प्रमाणेच पैसे भरणे असून, तेही नागरिकांकडून वेळेवर भरले जात नाहीत. तर नवीन कर आकारणी झाल्यानंतर वसुलीची अवस्था आणखीन बिकट असेल.

**नगरपरिषदेकडून स्वच्छता, पाणीपुरवठा, पथदिवे विज बीले, रस्ते, सोयी सुविधांची देखभाल तसेच अन्य कामे नगर परिषदेच्या कर उत्पन्नातूनच करण्यात येत असतात. नागरिकांनी कर न भरल्याने नागरिकांना दर्जेदार सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी नगरपरिषदेचे सर्व कर तातडीने भरून सहकार्य करावे.**

**–विराज लबडे, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगर परिषद**

## तानाजी चव्हाण कर्जत नगर परिषदेचे नवे मुख्याधिकारी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांची नुकतीच रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर नगर परिषद येथे बदली झाली असून त्यांच्या रिक्त जागेवर नांदेड जिल्ह्यातील देगलूर नगर परिषद येथून तानाजी चव्हाण कर्जत नगर परिषदेचे नवे मुख्याधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.

सप्टेंबर २०२२ रोजी कर्जत नगर परिषदेवर वैभव गारवे यांची मुख्याधिकारी म्हणून नेमणूक झाली होती. कर्जत नगर परिषदेतील लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ गेली वर्षभरापूर्वी संपलेला असल्याने पालिकेचे संपूर्ण कामकाज प्रशासक म्हणून मुख्याधिकारी वैभव गारवे हाताळत होते.



नगरपरिषद हद्दीत पाणी पुरवठा समस्या, स्वच्छता निवारण, वाहतुकीचा प्रश्न देखील नागरिकांना भेडसावत आहे. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यशस्वी होतील का? याकडे कर्जतकरांचे लक्ष लागले आहे.

## अलिबाग येथे सांस्कृतिक कार्य विभागाच्या नाट्य प्रशिक्षण शिबिराचा समारोप





**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग येथे सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य शासन मुंबई यांच्या विद्यमाने घेण्यात आलेल्या नाट्य प्रशिक्षण शिबिराचा समारोप विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सदर नाट्यशिबीराचे प्रशिक्षण रिदम स्टुडिओ हॉल आनंद नगर चेंढरे अलिबाग येथेदिनांक १५ ते २४ मार्च २०२५ हा कालावधी घेण्यात आले. तसेच त्याचा समारोप श्री विठ्ठल मंदिर सभागृह हॉल वरसोली, अलिबाग येथे ाकरण्यातआले.

सदर नाट्य प्रशिक्षण शिबिरात नाट्यदिग्दर्शक निर्माते लेखक नृत्य दिग्दर्शक व रंगभूषा व नेपथ्य व अशा विविध कलावंतांनी व नाट्य शिबिरातील नवोदित कलावंतांना मोलाचेमार्गदर्शनकेले.समारोपाच्या प्रसंगी नाट्य प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी, नवोदित कलावंतांनी विविध कला,

नाट्य, अभिनय, गायन, नृत्य, फॅशन शो, बासरी वादन, ढोलकी वादन अशा विविध कला सादरकरण्यात आल्या त्याला उपस्थित मान्यवरांनी व रसिक प्रेक्षकांनी मोठी दाद देऊन नवोदित कलावंतांचेअभिनंदन करण्यात आले. यावेळी अनेक नवोदित कलावंतांनी नाट्य प्रशिक्षण शिबिराबद्दल महाराष्ट्र शासनाचे व मार्गदर्शन लाभलेल्या लेखक दिग्दर्शक ज्येष्ठ कलावंतांचे व आयोजकांचे सर्वांनी अभिनंदन केले.

सदर समारोप कार्यक्रमाला लेखक दिग्दर्शक व शिबीर संचालक वैभव महाडिक, लेखकदिग्दर्शक किशोर म्हात्रे , अभिनेते योगेश पवार, शासनाचे कार्यक्रम अधिकारी मच्छिंद्र पाटील, नृत्य दिग्दर्शक अमित घरत, प्रसिध्द रंगभूषाकार उलेश खंदारे, मुंबई व प्रकाश योजनाकार प्रकल्प वाणी तसेच अलिबाग तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात लेखकदिगदर्शक वैभव महाडिक यांनी लेखन,दिगदर्शन आणि अभिनय यावर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले, जेआधुनिक रंगभूमी वर काम करण्यासाठी अतिशय उपयुक्त आणि प्रत्येक कलाकाराला शिकण्यासारखे आहे. ज्यात त्यांनी वाचिक अभिनय, बॉडी लँग्वेज, आधुनिक रंगभूमी, आवाजाचे चढउतार, चेहऱ्याचेहावभाव, इतर व्यायाम व सादरीकरण अशा अनेक बाबी उत्तमरीत्या शिकवल्या. तसेच प्रसिद्धरंगभूषाकार उलेश खंदारे, नृत्य दिगदर्शक अमित घरत, आणि इतर मान्यवरांनी नेपथ्य, संगीत,वेशभूषा, प्रकाशयोजना या नाटकाच्या महत्त्वाच्या घटकांवर मोलाचे मार्गदर्शनकेले.

या शिबिरातऋग्वेद पडोळे, संदिप पाटील, सारा पडोळे, महेंद्र म्हात्रे, सई पडोळे, हृषिकेश कडू, देवदत्त घरत,नंदकुमार कडू, अतूल पिलावे, ओम थोडसरे, रुपाली वाघमारे, तृप्ती पाटील, आराध्य पाटील, रंजनापाटील, प्रकाश पाटील, बी.एन.पाटील, नंदकिशोर पाटील, नयना पाटील या प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला होता. नवोदित कलाकारांनी कबड्डी, कविता आणि फॅशन शो नावाची नाटिका सादर केली.

## ११ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक; दोन जणांना अटक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गोरेगांव पोलीस ठाणे हद्दीत सांन्याचे दागिने तारण घेवुन दोन महिन्याच्या मुदतीकरीता पैसे देते व मुदतीत पैसे न घेता दागिणेपरत करते असे सांगुन अकरा लाख ३५ हजार रुपयांची फसवणुक केल्याचा गुम्हा दाखल झाला आहे

माणगाव तालुक्यातील मौजे उसरघर गावात आरोपी यांनी आपसात सगंणमत करून फिर्यादी व साक्षीदार आमची विश्वासु असुन गरजु लोकांचे सांन्याचे दागिने तारण घेवुन दोन महिन्याच्या मुदतीकरीता पैसे देते व मुदतीत पैसे न घेता दागिने परत देते असे सांगुन विश्वास संपादन केला

दिनांक १२डिसेंबर २०२३ ते ६ मार्च २०२५ या कालवधित फिर्यादी यांनी टप्याटप्याने त्याचे व नातेवाईकांचे ५५.८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आरोपी यांच्याकडे दिले असुनत्याबद्ल्यात आरोपीत याने फिर्यादी यांना ११,३५,०००/–रू दिले व आरोपी याचेकडे सागितलेप्रमाणे वारंवार मागणी करून देखील सोन्याचे दागिने परत न करता फिर्यादी व साक्षीदार याचीआरोपीत क्रं १ व २ यानी फसवणुक केली. अटक करण्यात आली आहे.


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. धनाजी उर्फ धुळ्या मारूती पाटील, २. श्री. विठ्ठल मारूती पाटील, ३. श्री. बारकु मारूती पाटील, ४., श्री. सुदाम महादु पाटील ५. श्री. शालिक महादु पाटील, सर्व रा. दुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड, व इतर यांनी १. श्री. गोविंद जयराम पाटील, २. श्री. बाळाराम जयराम पाटील, १ व २ रा दुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड, ३. श्री. काळुराम बाळु पाटील, मयत तर्फे वारस ३/१. श्रीम. चांगुना काळुराम पाटील, ३/२.श्री. प्रदिप काळुराम पाटील, ३/३.श्री. महेंद्र काळुराम पाटील, ३/४.श्री. संदिप काळुराम पाटील, ३/५. श्रीम. ताईबाई जनार्दन सिनारे, वरिल ३/१ ते ३/५ रा टुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड, ३/६. श्रीम. सुलोचना हनुमान भोपी, रा. रिटघर, पो. मोरबे, ता. पनवेल, जि. रायगड, ३/७. श्रीम. यशोदा हिरामण घरत, रा. चिरनेर (मुळपाडा), चिरनेर गणपती मंदीराच्या मागे, ता. उरण, जि. रायगड ४. श्रीम. वनाबाई अर्जुन दवणे, रा. दुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड ५. श्री. हनुमान गंगाराम भोपी, रा. रिटघर, ता. पनवेल, जि. रायगड, ६. श्रीम. जयश्री पंडीत घरत, रा. वरचे ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड, ७. श्री. नाना सिताराम पाटील, ८. श्री. जनार्दन सिताराम पाटील, ९. श्री. संजय नाना पाटील, १०. श्री. राजेंद्र नाना पाटील, ११. श्रीम. सुंदर बबन उसाटकर, १२. श्री. राम जगन उसाटकर, १३. श्री. श्याम जगन उसाटकर, वरिल क्र. ७ ते १३ रा. सुंदरे, ता. पनवेल, जि. रायगड, १४. श्रीम. शामा हरिश्चंद्र उलवेकर, रा. दुंदरे पाडा, ता. पनवेल, जि. गयगड, १५. श्रीम. नंदा राम माळी, रा. उम्रोली, ता. पनवेल, जि. रायगड, १६. श्रीम. चंदा काना म्हात्रे, रा. नेरेपाडा, ता. पनवेल, जि. रायगड, १७. श्रीम दर्शना जयदास डांगरकर, रा. उसर्ली, पो. वाजे, ता. पनवेल, जि. रायगड, १८. श्रीम. आशा जगन उसाटकर उर्फ आरती दिपक भोईर, रा. इनामपुरी, पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड, १९. श्री. रामकृष्ण बाळाजी म्हात्रे, रा. नेरूळ गाव, पो. नेरूळ, नवी मुंबईयांचे विरुद्ध पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.मु.क्र. २०६/२०२४ प्रमाणे खालिल नमुद वर्णनाच्या मिळकतीतुन आपला अविभजीत हक्क व हिश्श्याकरीता दावा दाखल केलेला आहे; सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे;

**दावा मिळकतींचे वर्णन**

**मौजे – दुंदरे व मौजे शिवणसई, ता. पनवेल, जि. रायगड,**

| अनु क्र. | मौजे | जुना सर्व्हे नं. /हिस्सा नं. | नविन सर्व्हे नं /हिस्सा नं | हे.आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १. | दुंदरे | ७५/५ | ४६/५ | ०.३३.६० | ४.३१ |
| २. | दुंदरे | ३१/० | १३/० | ०.५०.०० | ०.८४ |
| ३. | दुंदरे | ७५/४/अ | ४६/४/अ | ०.०७.१० | ०.९७ |
| ४. | दुंदरे | ७५/६ | ४६/६ | ०.१२.६० | १.८१ |
| ५. | दुंदरे | ३०/४ | १२/४ | ०.२१.५० | २.३७ |
| ६. | दुंदरे | ४६/० | २८/० | ०.०२.३० | ०.१२ |
| ७. | दुंदरे | ५८/६ | ४०/६ | ०.२२.९० | १.४४ |
| ८. | शिवणसई | १९ | – | ०.३५.४० | ४.७५ |
| ९. | शिवणसई | २७ | – | ०.७८.४० | १३.७५ |

याप्रमाणे मिळकतीचे वर्णन असुन सदर मिळकतीबाबत ना. न्यायालयात आजरोजी दावा प्रलंबित असुन सदर दाव्याचेकामी मनाई हुकुमाचा अर्जाची सुनावणी देखील आजरोजी प्रलंबित आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद मिळकती संबधी कोणाही व्यक्तीने अथवा संस्थेचे गहाण, दान, लीज, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकास करारनामा, भाडेपट्ट्टा अथवा कोणत्याही प्रकारचा आर्थीक व्यवहार करु नयेत. अन्यथा सदरहु मिळकतीबाबतची वरिल परीस्थीती दुर्लक्षीत करुन प्रस्तुतचे प्रतिवादी यांचे सोबत कोणताही करार अगर व्यवहार केल्यास सदरचे खरेदीखत अथवा सदरचा करार अगर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याकामी होणाऱ्या खर्चाची व परीणांमास आपणास जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :– २७/०३/२०२५

**सही/–**
**ॲड. किशोर भिम करावकर,**
पत्ता. रुम नं. ३०१–३०२,
गंगा निवास, प्लॉट नं. १०६, से. आर– ३,
पुष्पक नोड, वडघर, पनवेल जि. रायगड,


## गुढीपाडव्यानिमित्त बांबूच्या काठ्यांची मागणी वाढली



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

हिंदू धर्मातील नवीन वर्षाचा प्रारंभ असलेला गुढीपाडवा आता फक्त धार्मिक उत्सव नाही, तर एक आर्थिक संधी बनला आहे. गुढी उभारणीसाठी आणि विविध शोभेच्या वस्तू निर्मितीसाठी बांबूच्या काठ्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. तसेच, बांबूच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

बांबूच्या लागवडीला कमी खर्च, कमी मशागत आणि कमी वेळात अधिक उत्पादन मिळते. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी बांबूची लागवड एक आकर्षक पर्याय ठरत आहे. गुढीपाडव्यासाठी गुढी उभारणीला लागणारी बांबूची काठीही सध्या मागणीच्या शिखरावर आहे. श्रीवर्धनमध्ये नारळ सुपारी आणि बांबूची लागवड जास्त प्रमाणात होत असून, मार्केटमध्ये बांबूच्या काठ्यांना ७० ते ८० रुपये प्रति काठी दर मिळत आहे.

बांबूला अनेक विविध उपयोग आहेत, जसे की बांधकाम, मांडव उभारणी, पर्यटनासाठी बांबूच्या घरांची निर्मिती, फर्निचर, फ्लोरिंग, अगरबत्ती, हस्तकला, चारकोल आणि इथेनॉल यांसारख्या उद्योगांमध्ये बांबूचा वापर होतो. कोकणातील विविध प्रजातीतील बांबू उत्कृष्ट प्रकारे वाढतात, आणि त्यामध्ये माणगा बांबूला अधिक पसंती आहे. हा बांबू लवचिक आणि भरीव असतो, ज्यामुळे त्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होते.गुढीपाडव्यानिमित्त बांबूच्या काठ्यांची विक्री १०० ते १५० रुपये प्रति नग दराने सुरू झाली आहे. बांबूच्या मोठ्या काठ्यांना अधिक मागणी आहे, कारण त्यांचा उपयोग फर्निचर, टोपल्या, फावडे आणि हातोड्यांसाठी होतो. त्याचबरोबर बांधकाम व्यावसायिक, मांडव उभारणी करणारे आणि परांशी असलेले व्यक्ती मोठ्या प्रमाणावर बांबू खरेदी करतात.

बांबूच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे, आणि त्याचा वापर उद्योग क्षेत्रात आणि विविध कलेतही वाढत आहे.

## खालापूर अपघातात क्लिनरचा मृत्यू

**खालापूर ; रामप्रहर वृत्त**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दि. १३ रोजी मौजे कुंभीवली गावचे हददीत मुंबई–पुणे एक्सप्रेस वे वर आरेपी रा. ओदपुरबस्ती जि आजमगढ उत्तरप्रद–`श याने त्याचे ताब्या–तील ट्रक निष्काळजीपणे व बेकदरकारपणे पुणे ते मुंबई असा एक्सप्रेस वे ने पहिल्या लेनमधुन चालवुन मुंबई बाजुकडे जाण–या ट्रक चे मागील बाजुस ट्रक ची ठोकर देवुन अपघ–ात करुन अपघातामध्ये क्लिनर जनकभाई मंडलिक याचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला


**Hiring Audit Staff**

**Fresh/ Experienced Audit staff required for CA firm**

at Hiranandani fortune city , Apollo 206, sector A, Garden enclave, Bhokarpada , Panvel

**Contact: 8390407010**



महावितरण

**ई–निविदा सुचना**

पेण मंडळ अंतर्गत सर्व ठेकेदार व खाली दिलेल्या विविध कारणास्तव जे म.रा.वि.वि.कं. मर्या., पेण मंडळातील लेनदार आहेत. अशा सर्वांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे तीन वर्षाच्या आधीची १) कंत्राटदार अनामत रक्कम (Security Deposit) २. बयाना रक्कम (EMD) यादी हि कार्यालयीन समायोजित करावयाची आहे. तरी पेण मंडळ अंतर्गत काम केलेले ठेकेदार व विविध कारणास्तव असलेले घेनदार यांनी त्याची दखल घ्यावी. तसेच सदर यादी ही पेण मंडळ कार्यालयात उपलब्ध आहे. कोणाची हरकत असल्यास जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत मा. अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्या., सब स्टेशन, अंतोरा रोड, पेण जिल्हा रायगड यांचे कार्यालय येथे पुराव्यानिशी संपर्क साधावा विहित मुदती नंतर सदरची रक्कम समायोजित होईल. नंतरची कोणतीही सबब ऐकली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

PRO NO. 479 | अधीक्षक अभियंता पेण मंडळ.



**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग,**
**अलिबाग पिन कोड – ४०२ २०१**

ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :– (०२१४१)२२२०८४/२२५०९६

**ई–निविदा सूचना क्र. ५३ सन २०२४–२०२५ (दुबार निविदा)**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | फल्याण वावे जांभूळपाडा नवघर ठाणाले एरल जामगांव प्रजिमा–३८ जांभूळपाडा गाव कि.मी. ७/८०० ते ८/५०० मध्ये गटरचे बांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | ३५,७५,०२३/– |
| २ | उसर फाटा ते नांदुकी रस्त्याचे बांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | ८२,६४,८६४/– |
| ३ | गावठेवाडी ते भपक्याचीवाडी रस्त्याचे बांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | ६५,४९,८५२/– |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक २७.०३.२०२५ (स.१०.०० ) ते दिनांक ३.०४.२०२५ (सं.१८.००)

**ई–निविदा उघडणे कालावधी :** दिनांक ७.०४.२०२५ (दु. ३.०० वा.) (कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचशे कार्यालयात)

**खालील संकेतस्थळावर ई– निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. )
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ १२२४/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग – ४०२ २०१
दिनांक :– २०/०३/२०२५

**सही/–**
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड

# मुरुडमध्ये शिवसृष्टीसाठी ७० लाखांची तरतूद

## रायगड जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी मंजूर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात एक आकर्षक व सुंदर अशी शिवसृष्टी बनवण्यासाठी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी सुरुवातीच्या कामांसाठीच्या पहिल्या टप्यात जिल्हा नियोजन मंडळाकडून ७० लाख रुपये मंजूर केले आहेत. शिवसृष्टी साकारत असताना छानसे उद्यानसुद्धा विकसित केले जाणार आहे.

काही दिवसांपूर्वीच खासदार सुनील तटकरे यांनी विकास आढावा बैठकीत शिवसृष्टी बांधण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. लवकरात लवकर शिवसृष्टी निर्माण केली जाईल, अशी घोषणा केली होती. जागा शोधण्याचे काम सुरू असतानाच पहिल्या टप्पा पूर्ण करण्यासाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याने शिवप्रेमी सुखावले आहेत.



शिवसृष्टी निर्माण करण्यासाठी कमीत कमी १२ गुंठे जागा नगर परिषद अथवा शासकीय जागा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून छत्रपती शिवाजी महाराज यांचा संपूर्ण आढावा घेणारी शिवसृष्टी निर्माण करून त्यांचा जाज्वल्य इतिहास तरुण पिढीस मार्गदर्शक ठरेल. त्या अनुषंगाने शासकीय यंत्रणेने जागा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन खासदार तटकरे यांनी केले होते. शिवसृष्टीसाठी मुरूड शहरातील आतापर्यंत पाच जागा पाहण्यात आलेल्या असून लवकरच एका जागेची निवड करण्यात येणार आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे यांनी सांगितले की, शिवप्रेमींचा आदर राखत शिवसृष्टी निर्माण करण्याचा निर्णय जाहीर केल्याने येथे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. जागेची उपलब्धता पूर्ण होत असतानाच पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी खासदार तटकरे यांनी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करून हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यासाठी आम्ही सर्व त्यांचे ऋणी आहोत.

# लेखी आश्वासनानंतर पाली भुतिवली प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे उपोषण स्थगित

## एक महिन्याचा अल्टिमेटम

**कर्जत : प्रतिनिधी**

विविध मागण्यांसाठी कर्जत तालुक्यातील पाली भुतिवली प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रांत कार्यालयाबाहेर साखळी उपोषण सुरू होते. अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले आहे. उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी प्रशासनाला एक महिन्याचा अल्टिमेटम देत आमच्या मागण्या पूर्ण न झाल्यास यापुढे हे आंदोलन तीव्र स्वरूपाचे करण्यात येणार असल्याचे सांगितले.

पाटबंधारे विभागाचे कोकण विभागीय अभियंता संजीव जाधव यांनी शेतकऱ्यांची उपोषणस्थळी भेट घेत त्यांच्या मागण्या मान्य केल्या. त्यामध्ये धरणात सुरू असलेला



नौकाविहार तत्काळ थांबवण्यात आले आहे. ठेकेदाराला काम करण्यासाठी रोखण्यात आले असून एक महिन्यात सर्व बाबींवर संबंधित प्रशासनाशी चर्चा करून पुढील काही दिवसात त्याची अंमलबजावणीही केली जाईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर शेतकऱ्यांनी उपोषण स्थगित केले.

# पेण पोलिसांचे वाहन मालकांना आवाहन

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाणे हद्दीतील पाच दुचाकी गेल्या पंधरा वर्षांपासून पोलिसांच्या ताब्यात आहेत. या गाड्यांची ओळख पटवून त्या घेऊन जाण्याचे आवाहन पोलिसांनी वाहनाच्या मालकांना केले आहे.



काळपट ग्रीनिश रंगाची बजाज कंपनीची कावासाकी मोटरसायकल (एमएच ०६-आर ३१४७), निळ्या रंगाची पॅशन प्रो मोटरसायकल (नंबर प्लेट नाही), काळ्या निळ्या रंगाची हिरो होंडा कंपनीची मोटरसायकल (नंबर प्लेट नसलेली), यामाहा कंपनीची लाल रंगाची मोटरसायकल (एसएच १३-५८८५), यमाहा कंपनीची काळ्या रंगाची मोटरसायकल (एसएच १३/३१२) या गाड्यांचे कोणीही मालक हे मालकी हक्क दाखविण्यासाठी पेण पोलीस ठाण्यात आले नाहीत. या गाड्या ऊन पावसामुळे सडून जीर्ण झालेल्या आहेत.

या मालकांचा शोध घेण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला, मात्र ते मिळू शकले नाहीत. या गाड्या कोणाच्या असतील त्यांनी ३० दिवसांच्या आत संपर्क करून ओळख पटवून घेऊन जाण्याचे आवाहन पेण पोलिसांनी केले आहे.

# धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर टाकू नका

## उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या आणि जातीय सलोख्याला हानी पोहचवणाऱ्या सोशल मीडियावर प्राप्त झालेल्या अथवा ऐकिवात आलेल्या पोस्ट कोणत्याही ग्रुपवर टाकू नका. खोट्या अफवांमुळे समाजात तेढ निर्माण होते. त्यामुळे त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी केले आहे.

आगामी काळात गुढीपाडवा, रमजान ईद, महावीर जयंती, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महाराष्ट्र दिन असे सण-उत्सव व महत्त्वाचे कार्यक्रम शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने खालापूर पोलीस ठाणे येथे



शांतता मोहल्ला कमिटी, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते यांची एकत्रित बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या अध्यक्षतेखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांच्या उपस्थितीत पार पडली. त्या वेळी ते बोलत होते.

बैठकीमध्ये शांतता मोहल्ला कमिटीकडून कोणत्या प्रकारे काम केलं पाहिजे तसेच सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या आक्षेपार्ह मेसेजला कशा प्रकारे आळा घालता येईल व त्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबत सविस्तर मार्गदर्शन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी केले. समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था राहण्याच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घेणे याबाबत सूचना दिल्या. धार्मिक जातीय तेढ निर्माण करणाऱ्या, जातीय सलोखा हानी पोहचवणाऱ्या, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहचविणाऱ्या, एखाद्या विशिष्ट समाजाला भडकविणाऱ्या कोणत्याही पोस्ट, संदेश सोशल मीडियाद्वारे पोस्ट करू नका किंवा अशा प्राप्त झालेल्या पोस्ट शेअर करू नका. जे कोणी असे पोस्ट करत असतील त्यांची माहिती पोलीस ठाण्यात द्यावी तसेच आपल्या मार्फत त्यांना योग्य ती समज द्यावी. कोणत्याही घटनेच्या पार्श्वभूमी विषयी संपूर्ण पडताळणी केल्याशिवाय आणि त्याबाबत सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय अशा घटनेबाबत सार्वजनिकरित्या किंवा सोशल मीडियावर विचार व्यक्त करू नका. त्याबाबत समाजामध्ये अफवा पसरू नये किंवा अफवावर विश्वास देखील ठेवू नये. जातीय सलोखा बिघडेल असे कोणतेही कृत्य करू नये. कोणत्याही धर्माच्या व्यक्तीच्या व्यक्तिगत किंवा सार्वजनिक भावना दुखावतील अशा प्रकारे स्टेटस किंवा पोस्ट सोशल मीडियावर शेअर करू नये किंवा व्हायरल करू नये, असे कदम यांनी म्हटले आहे.

आगामी काळामध्ये सर्व धर्मीय सण-उत्सव साजरा केले जाणार आहेत. ते शांततेत साजरे करण्यात यावेत याबाबत दक्षता घ्यावी. आगामी काळामध्ये खालापूर पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याबाबत योग्य त्या सूचना या वेळी देण्यात आल्या.

या बैठकीला यासीन भालदार, हुसेन कर्जिकर, इक्बाल बेडेकर, रफिक बेडेकर, शशिकांत मोरे, पोलीस पाटील संघटना अध्यक्ष अनंत पाटील, गाव पोलीस पाटील यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोह्यातील वाशी येथे नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जय हनुमान क्रीडा मंडळ वाशी यांनी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर हनुमान मंदिरात आयोजित केले होते. या शिबिरात गावातील असंख्य नागरिकांनी सहभाग नोंदविला.

शिबिरास भाजप रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे तसेच लायन्स क्लब ऑफ रोहा, लिओ क्लब ऑफ रोहा, युथ लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांचे शिबिरास सहयोग लाभले. या उपक्रमाला भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

या वेळी लायन्स क्लबचे भाऊसाहेब माने, जयदेव पवार, रशीदा रोहवाला, गावातील अध्यक्ष चंद्रकांत भोईर, पोलीस पाटील रमेश बामणे, महादेव जंगम, गणेश जोगडे, तानाजी रटाटे, रमेश जंगम, लक्ष्मण रटाटे, विकास जोगडे, सागर जोगडे, निलेश जंगम, विकास बामणे, सागर पोटले, सायली बामणे, वंदना सुतार, सुलोचना भोईर, ज्योती लहाने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन मंडळाचे अध्यक्ष कृष्णा बामणे यांनी केले. संदेश बामणे यांनी मनोगत व्यक्त केले.

या शिबिराच्या माध्यमातून १२ नागरिकांवर मोतिबिंदूची शस्त्रक्रिया होणार असून त्यांना लवकरच चांगली दृष्टी मिळेल.



# सहानींकडून दिलगिरी व्यक्त

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषदेकडून काही दिवसांपूर्वी दिवाइन स्टे होमवर कारवाई करण्यात आली होती. या स्टे होमचे मालक जसपाल सहानी यांनी कारवाई होण्याअगोदर मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांना वकिलाची नोटीस पाठवून आरोप केले होते. या नोटीसमध्ये मुख्याधिकारी यांची बदनामी होईल असे आरोप होते. अखेर सहानी यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

नगर परिषदेने जसपाल सहानी यांच्या मालकीच्या असणाऱ्या दिवाइन स्टे होमवर कारवाई करीत संरक्षक भिंत, पर्यटकांना बसण्यासाठी षटकोनी आकाराचे तयार करण्यात आलेले गजेबोसुद्धा तोडण्यात आले होते. कारवाईनंतर आता दिवाइन स्टे होमचे मालक जसपाल यांनी एका पत्राद्वारे कथित केलेल्या आरोपांबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी नगर परिषदेला पाठवले आहे.

# वृद्धाश्रमांना भेट देऊन वैश्य एकता दिवस साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

वैश्य फेडरेशन रायगडच्या वतीने वृद्धाश्रमांना भेट देऊन तेथे असलेल्या जेष्ठ नागरिकांबरोबर हितगुज साधत व त्यांच्या समस्या जाणून घेत वैश्य एकता दिन साजरा करण्यात आला. या वेळी गीते सादर करताना अनेक ज्येष्ठ नागरिकांनी ठेका धरला.

वैश्य फेडरेशन जिल्हा अध्यक्ष कैलास पोटे, सेक्रेटरी सुभाष तांबोळी, खजिनदार सुनील भोपतराव, महिला जिल्हा अध्यक्ष हर्षला तांबोळी, युवक अध्यक्ष उदय मनोरे आदींसह फेडरेशनच्या पदाधिकारी व वैश्य समाज बांधवांनी श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्था संचालित राजाश्रय वृद्धाश्रम रसायनी-मोहपाडा व सेवागंण वृद्धाश्रम पेण येथे भेट देऊन तेथील वयोवृद्धांशी चर्चा करीत त्यांच्याबरोबर समन्वय साधला. या वेळी त्यांचे डोळे अक्षरशः पाणावले.



गिटार वादक प्रितेश चौधरी यांनी सर्वांना गिटार वाजून मंत्रमुक्त केले. अगदी ९५ वर्षाची आजी सुद्धा गाण्यांवर ठुबकली. काही वृद्धांनी आपण वृद्ध आहोत व आपल्याला आपल्या कुटुंबापासून वेगळे ठेवलेले आहे या गोष्टीची जाणीव विसरून ते सर्व कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यातील काही वृद्धांनी कविता, गाणी सादर केली. त्यांचा निरोप घेताना डोळे पाणावले. दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून वृद्धांना फळांचे वाटप करण्यात आले.

या वेळी राजाश्रय वृद्धाश्रमातील शुभश्री भोईर यांनी सांगितले की, अनेक जण वृद्धाश्रमाला भेट देतात आणि निघून जातात, परंतु तुम्ही आम्हांला आपलेसे केलेत. स्नेहांगण वृद्धाश्रम येथील पटवर्धन काकूंनी तुम्ही आमच्याकडे येऊन आम्हाला हसते-बोलते केलेत याबद्दल आभार मानले.

कार्यक्रमास वैश्य फेडरेशन रायगड सल्लागार दत्तात्रय तांबोळी, कार्यकारिणी सदस्य योगेश तांबोळी, विवेक आंग्रे, सूर्यकांत गुप्ता, प्रकाश मनोरे, राजन चौधरी, राजेंद्र चौधरी, सचिन झिंजे, विजय तांबोळी, नरेश तांबोळी, शिवसेवक गुप्ता, प्रितेश चौधरी, सीमा तांबोळी, श्रीया आंग्रे, सचिन झिंजे, मयूर मनोरे, अंकेश मनोरे, दर्पण गुप्ता आदी उपस्थित होते.

# पेणमध्ये मुलांसाठी विविध स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

सीएफआय आणि बीएनवाय मेलनतर्फे चालू असलेल्या रेमेडीअल क्लासमधील मुलांसाठी नुकतेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये चित्रकला, भाषण, निबंध, पाढे पाठांतर, उलटे अंक बोलणे, मनाचे श्लोक, मराठी आणि इंग्रजी गोष्ट सांगणे आणि प्रश्नमंजुषा अशा स्पर्धा घेण्या आल्या. या स्पर्धांमध्ये एकूण १४६ मुलांसोबत ४० शिक्षक आणि पालक सहभागी झाले होते. मुलांनी आपल्या आवडीनुसार वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये उत्साहाने भाग घेतला आणि कलागुण दाखविले. स्पर्धांमध्ये सहभागी होत असताना मुले खूप आनंदी होती. स्पर्धांचे परीक्षण संजय गोवीलकर यांनी केले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सोशल वर्कर आणि क्लासमधील शिक्षकांनी मेहनत घेतली. संस्थेचे प्रमुख डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडल्या.





# महाडच्या जगताप महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**महाड : प्रतिनिधी**

माजी आमदार स्व. माणिक जगताप यांनी स्थापन केलेल्या एम.एम. जगताप इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा सोमवारी (दि. २५) झाला. या वेळी बोलताना महाड उत्पादक संघटनेचे अध्यक्ष तथा विनती आरगॅनिकचे व्हाईस चेअरमन महेश पुरोहित यांनी, यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी भविष्याचा विचार करून आपले ध्येय निश्चित केले पाहिजे, असा सल्ला दिला.




या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुरोहित यांच्यासह महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, माजी नगराध्यक्ष संदीप जाधव, संस्थेचे संजय चिखले, महाविद्यालयाच्या प्राचार्य स्मिताली यादव, प्राचार्य डॉ. एम.एन. वाणी, उपप्राचार्य डॉ. अंजय धनावडे, आदी उपस्थित होते.

या वेळी चालू शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळवले आहे, अशा विद्यार्थ्यांना एम.एम. जगताप विद्यालय आणि महाविद्यालय शैक्षणिक संकुलातर्फे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

निलेश पवार यांनी विद्यार्थ्यांनी आपले आदर्श जपले पाहिजे आणि या आदर्शांचा विचार, कार्य डोळ्यासमोर ठेवून आपले लक्ष साध्य केले पाहिजे, असे सांगितले.

संस्थेचे संजय चिखले यांनी प्रमुख वक्त्यांनी दिलेला सल्ला विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये प्रत्यक्षात आणला पाहिजे आणि वाचनावर भर दिला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

तत्पूर्वी प्राचार्य डॉ. वाणी यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना या महाविद्यालयाला नॅक प्रमाणपत्र मिळाल्याचे सांगून स्वतः लादेखील पुरस्कार मिळाल्याचे सांगितले. सांस्कृतिक विभागाच्या प्रा. गीतांजली पाटील यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर संस्थेचे वाणी यांनी सर्वांचे आभार मानले.

# गुजरातविरुद्ध पंजाबचे बल्ले बल्ले!

## आयपीएलच्या नव्या हंगामात विजयी सुरुवात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्ज संघाने घरच्या मैदानात खेळणाऱ्या शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स संघाला मंगळवारी पराभूत केले. या विजयासह पंजाब संघाने यंदाच्या हंगामात दमदार सुरुवात करत आपल्या खात्यात दोन गुण जमा केले आहेत. अखेरच्या षटकात पंजाबकडून इम्पॅक्ट प्लेयरच्या रुपात आलेल्या विजयकुमार वैशक याने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करीत गुजरात संघाला बॅकफूटवर ढकलले.



पंजाबच्या संघाने दिलेल्या २४४ धावांच्या आव्हाना पाठलाग करताना गुजरात टायटन्स संघाकडून कर्णधार शुबमन गिल आणि साई सुदर्शन जोडीने डावाची सुरुवात केली. या दोघांनी पॉवरप्लेमध्ये फटकेबाजी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली, पण सहाव्या षटकातील पाचव्या चेंडूवर बॅटिंगमध्ये झिरो ठरलेल्या ग्लेन मॅक्सवेलने शुबमन गिलच्या रूपात गुजरातच्या संघाला पहिला धक्का दिला. शुबमन १४ चेंडूत ३३ धावांची खेळी करुन माघारी फिरला. कर्णधार तंबूत परतल्यावर साई सुदर्शनने ४१ चेंडूत पाच चौकार आणि सहा षटकाराच्या मदतीने ७४ धावा करत संघाच्या आशा पल्लवित ठेवल्या, पण अर्शदीप सिंगने त्याची विकेट घेत संघाला मोठा दिलासा दिला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना जोस बटलरने ३३ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकाराच्या मदतीने ५४ धावांची खेळी केली. मार्को यान्सेन याने त्याला बोल्ड केले. त्याची विकेट पडल्यावर गुजरातच्या संघाच टेन्शन वाढले. अखेरच्या षटकात विजयकुमार वैशक याने सुरुवातीला तुफान फटकेबाजी करणाऱ्या शेरफेन रुदरफोर्डचा वेग कमी केला अन् सामना पंजाबच्या बाजूने फिरला.

पंजाब किंग्जच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना कर्णधार श्रेयस अय्यरच्या ४२ चेंडूतील नाबाद ९७ धावा आणि अखेरच्या षटकात शशांक सिंग याने केलेली १६ चेंडूतील ४४ धावांची तुफान फटकेबाजीच्या जोरावर धावफलकावर निर्धारित २० षटकात २४३ धावा लावल्या होत्या. या दोघांशिवाय पंजाबच्या ताफ्यातील युवा सलामीवीर प्रियांश आर्याने पदार्पणातील सामन्यात २३ चेंडूत ४७ धावांचे योगदान दिले.

# आंतर जिल्हा निमंत्रित निवड चाचणी स्पर्धेसाठी 'आरडीसीए'चा संघ जाहीर

**अलिबाग, खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतर जिल्हा निमंत्रित निवड चाचणी दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेसाठी ायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा १९ वर्षाखालील मुलांचा संघ जाहीर करण्यात आला आहे.

या संघात आर्यन देशमुख (कर्णधार), सिद्दीकी आल्तमाश यष्टिरक्षक, आयुष माळी, क्रिश बहिरा, रिषभ पगारे, सर्वेश उलवेकर, अमेय पाटील, नफीझ अहमद, साईराज जोशी, आर्यन पानावकर, मिलन चौरसिया, अनिकेत नलावडे, आर्यन निकाळजे, साहिल पोपेटा राखीव खेळाडू म्हणून अथर्व खांडेकर, अभिषेक वर्मा, अमेय भोसले, अमित शर्मा, श्रेय घरत, पश्चिम विभागासाठी राहुल प्रजापती, आर्य लांजिले, शुभम पाटील, सुप्पना पराद, जय बैकर, निलय सावंत यांचा समावेश आहे. मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, प्रशिक्षक सागर सावंत व व्यवस्थापक म्हणून सागर मुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या संघाला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.

## पॉवरलिफ्टिंगपटू विक्रमसिंह अधिकारीचे यश

**पनवेल :** शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित पॅरा पॉवरलिफ्टिंग खेळाडू आणि नेरूळ नवी मुंबई येथील रहिवासी विक्रमसिंह अधिकारी यांनी दोन पदके प्राप्त केली आहेत. त्यांनी राष्ट्रीय स्तरावर कांस्यपदक आणि खेलो इंडिया स्पर्धेत सहभागी होऊन कांस्यपदक जिंकले.




नियमित सराव, जिद्द, योग्य प्रशिक्षण यामुळे आपण यशस्वी होतो, असे विक्रमसिंह अधिकारी यांचे मत आहे. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी प्रशिक्षक राकेश पाटील यांना दिले. खेलो इंडिया स्पर्धा दिल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे. यात त्यांनी यश मिळवल्याने अभिनंदन होत आहे.

# ...म्हणून श्रेयसला स्ट्राईक दिला नाही!

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरात जायंट्सविरुद्धच्या आयपीएल २०२५मधील अटीतटीच्या सामन्यात श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्स विरूद्ध संघाने ११ धावांनी बाजी मारली. श्रेयस अय्यरने या सामन्यात गुजरातच्या गोलंदाजांना जेरीस आणले. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी उतरलेला श्रेयस नाबाद ९७ धावा करत माघारी परतला. याबाबत संघसहकारी शशांक सिंगने मोठा खुलासा केला आहे.

## सामन्यानंतर शशांकचा खुलासा



श्रेयसने ४२ चेंडूत पाच चौकार आणि नऊ षटकारांसह ९७ धावांची खेळी केली. श्रेयसचे शतक अवघ्या तीन धावांनी हुकले. यामागे कारण ठरला त्याचा संघसहकारी शशांक सिंग. शशांकने अखेरच्या षटकात फटकेबाजी करत श्रेयसला स्ट्राईक दिली नाही आणि त्यामुळे श्रेयसचे शतक हुकले. शशांकने याबाबत खुलासा केला.

श्रेयस अय्यरने १९व्या षटकाच्या अखेरीस ९७ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यामुळे अखेरच्या षटकात शशांक एक धाव घेऊन त्याला शतक पूर्ण करू देईल, अशी अपेक्षा होती, पण २०व्या षटकाच्या सिराजच्या पहिल्या चेंडूवर शशांकने चौकार मारला. त्यानंतर पुढच्या चेंडूवर दोन धावा घेतल्या. त्याने तिसऱ्या चेंडूवर चौकार, चौथ्या चेंडूवर चौकार आणि मग पुढच्या दोन चेंडूवर चौकार मारून कर्णधार अय्यरला स्ट्राईकच दिली नाही. त्यामुळे अय्यरचे शतक अवघ्या तीन धावांनी हुकले. शशांकने अवघ्या १६ चेंडूत सहा चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४४ धावा केल्या.

सामन्यानंतर अय्यरच्या शतकाबाबत शशांक सिंग म्हणाला की, होय, हा एक चांगला कॅमिओ होता, पण श्रेयसची फलंदाजी पाहून मला आणखी प्रेरणा मिळाली. श्रेयस मला पहिल्याच चेंडूपासून म्हणाला होता, माझ्या शतकाचा विचार करू नकोस, फटकेबाजीकडे लक्ष दे.

पुढे शशांक म्हणाला, मी चेंडू पाहतो आणि खात्रीशीर चौकार लगावण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा या क्रमांकावर फलंदाजीसाठी उतरतो, तेव्हा काही वेळेस चांगले फटका बसण्याची शक्यता कमी असते. मला माहीत आहे की, मी कोणते फटके खात्रीशीर खेळू शकतो. करू शकत नसलेल्या गोष्टींपेक्षा मी माझ्या सामर्थ्यावर लक्ष केंद्रित करतो.

# मॅक्सवेलच्या नावे नकोसा विक्रम

## रिव्ह्यू न घेण्याच्या चुकीमुळे बसला मोठा फटका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयपीएल लिलावानंतर पंजाबच्या संघात ग्लेन मॅक्सवेलचे पुनरागमन झाले आहे. पण पहिल्याच सामन्यात तो गोल्डन डकवर बाद झाला आणि नकोसा विक्रम आपल्या नावे केला. विशेष म्हणजे मॅक्सवेल नाबाद होता.

गुजरातचा कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाबने प्रथम फलंदाजी करत धमाकेदार सुरुवात केली. सुरुवातीच्या विकेट पडल्यानंतर सगळ्यांना ग्लेन मॅक्सवेलकडून मोळ्या खेळीच्या आशा होत्या, पण पहिल्याच चेंडूवर साई सुदर्शनने त्याला आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवले.



सुदर्शनच्या चेंडूवर ग्लेन मॅक्सवेल रिव्हर्स स्वीप खेळण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटला लागला नाही तर पॅडला लागला. गुजरात संघाने अपील केले आणि पंचांनीही बाद झाल्याचा इशारा केला. मॅक्सवेल मैदानावर फार वेळ न थांबता थेट पॅव्हेलियनच्या दिशेने जाऊ लागला. त्यानंतर काही वेळाने रिप्लेमध्ये दिसले की, चेंडू स्टंप्सला हिट करीत नसून स्टंप्सच्या वरून जात आहे. म्हणजेच मॅक्सवेल नाबाद होता, पण त्याने रिव्ह्यू घेतला नव्हता.

गुजरात टायटन्सविरूद्ध सामन्यातील पहिल्याच चेंडूवरील विकेटसह मॅक्सवेलने नकोसा विक्रम आपल्या नावे केला आहे. आयपीएलच्या इतिहासात मॅक्सवेलच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रम नोंदवला गेला आहे. तो १३० डावांमध्ये सर्वाधिक १९ वेळा शून्यावर बाद झाला आहे.

### कोच पॉंटिंगही वैतागला

मॅक्सवेलने रिव्ह्यू घेतला असता तर तो बाद झाला नसता. मॅक्सवेलचा रिव्ह्यू न घेण्याचा निर्णय पाहून पंजाबचा कोच रिकी पॉंटिंग वैतागलेला दिसला. पॉंटिंगने मान हलवत राग व्यक्त केला. काही वेळाने रिप्लेमध्ये दिसून आले की मॅक्सवेलने श्रेयस अय्यरबरोबर चर्चा केली होती. मॅक्सवेल श्रेयसला म्हणत होता की, चेंडू बॅटला लागलेला नाही. त्यामुळे श्रेयस व मॅक्सवेलने रिव्ह्यू न घेण्याचा निर्णय घेतला.

## इम्पॅक्ट प्लेयर नियम टी-२० क्रिकेटच्या विकासात मोलाची भूमिका बजावेल

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये 'इम्पॅक्ट प्लेयर'चा नियम पहिल्यांदा लागू झाला त्या वेळी महेंद्रसिंह धोनी फारसा आशावादी नव्हता. तथापि, धोनीच्या भूमिकेत आमूलाग्र बदल झाला. हा नियम टी-२०च्या विकासात मोलाची भूमिका बजावेल, असा विश्वास माहीने व्यक्त केला आहे.

### कॅप्टन कूल धोनीचे मत

४३ वर्षाचा धोनी स्वतःला इम्पॅक्ट प्लेयर समजत नाही, कारण तो अद्याप संघासाठी पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक आहे. जियो स्टारशी बोलताना धोनी म्हणाला की, हा नियम पहिल्यांदा लागू झाला तेव्हा असे वाटले की, याची गरजच काय? काही मर्यादेपर्यंत मला या नियमाची मदतही झाली. मी यष्टिरक्षण करीत असल्याने इम्पॅक्ट प्लेयर नाही. या नियमानुसार पुढे जावे लागेल. अनेकांचे मत असे की, या नियमामुळे खोऱ्याने धावा निघत आहेत. माझे मत असे की, फलंदाज सहजवृत्तीने खेळत असल्याने असे घडत आहे. या नियमामुळे संघांना कडवी स्पर्धा असेल, तर एक अतिरिक्त फलंदाज ठेवण्याची संधी मिळते. हा अतिरिक्त फलंदाज ठेवल्यामुळे धावसंख्या वाढते असे मुळीच नाही. खरंतर हा मानसिकतेशी जुळलेला मुद्दा आहे. सर्वच संघांकडे अतिरिक्त फलंदाजांची सोय उपलब्ध आहे. त्यामुळेच संघ अधिक आक्रमक खेळताना दिसतात.

# तब्बल २७ कोटींची बोली लागलेला ऋषभ पंत पहिल्या सामन्यात फेल

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये सोमवारी लखनऊ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स हे दोन संघ विझागमधील एसीए-व्हीडीसीए मैदानावर एकमेकांशी भिडले. दरम्यान, फलंदाज ऋषभ पंत हा त्याचा माजी संघ दिल्ली कॅपिटल्सविरोधात पहिलाच सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला, मात्र यंदाच्या आयपीएल हंगामातील पहिलाच सामना खेळताना पंत सहा चेंडू खेळून शून्य धावांवर बाद झाल्याचे पहायला मिळाले.

ऋषभपंतला १४व्या षटकामध्ये भारतीय क्रिकेटसंघातील त्याचा सहकारी कुलदीप यादवने बाद केले. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आलेल्या मेगा ऑक्शनमध्ये २७ वर्षीय पंतला लखनऊच्या संघाने २७ कोटी रुपये



खर्चून करारबद्ध केले होते. यामुळे पंत हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे.

दरम्यान, एलएसजीचे चाहते पंतकडून एका दमदार खेळीची अपेक्षा करत होते, पण तो शून्यावर बाद झाल्याने त्यांना निराश व्हावे लागले. शिवाय कर्णधार पंतकडून निर्णायक क्षणी झालेल्या चुकीमुळे लखनऊला एका गड्याने पराभव पत्करावा लागला.

तब्बल २०९ धावा उभारल्यानंतर लखनऊने दिल्लीची ५ बाद ६५ अशी अवस्था केली होती. त्यानंतर आशुतोष आणि विपराज यांनी महत्त्वपूर्ण भागीदारी करीत दिल्लीला विजयी मार्गावर आणले. अखेरच्या षटकात दिल्लीला सहा धावांची, तर लखनऊला केवळ एका बळीची गरज असताना ऋषभ पंतने पहिल्याच चेंडूवर मोहित शर्माला यष्टिचीत करण्याची संधी गमावली आणि येथेच सामना लखनऊच्या हातून निसटला.

# युवा क्रिकेटर प्रियांश आर्याचे आयपीएलमध्ये दमदार पदार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १८व्या हंगामात गुजरात टायटन्सचा पराभव करीत पंजाब किंग्ज संघाने पहिला विजय साकारला. पंजाब संघाने या सामन्यात युवा क्रिकेटर प्रियांश आर्याला पदार्पणाची संधी दिली. यंदाच्या हंगामात पदार्पणाची संधी मिळाल्यावर त्याने सोने केले.




२३ वर्षीय प्रियांश डावखुऱ्या हाताने स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. याशिवाय उजव्या हाताने तो ऑफ ब्रेक गोलंदाजीही करू शकतो. २०२१मध्ये त्याने दिल्लीच्या संघाकडून देशांतर्गत क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. तो १९ वर्षीय भारतीय संघाकडूनही खेळला आहे. दिल्ली प्रीमियर लीग स्पर्धेत सहा चेंडूत सहा षटकार मारून त्याने लक्ष वेधून घेतले होते.

आयपीएलमधील पदार्पणाच्या सामन्यात पहिल्या षटकापासूनच प्रियांशनं आपल्या बॅटिंगमधील तोरा दाखवून दिला. त्याचे अर्धशतक अवघ्या तीन धावांनी हुकले. राशिद खानच्या गोलंदाजीवर तो झेलबाद झाला. अर्धशतक हुकले असले तरी त्याने कडक फटकेबाजीत मैफिल लुटली. २३ चेंडूत त्याने सात चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २००पेक्षा अधिकच्या स्ट्राइक रेटने ४७ धावा कुटल्या.

आयपीएलच्या मेगा लिलावात या अनकॅप्ड खेळाडूला आपल्या ताफ्यात घेण्यासाठी पंजाब आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात चुरस रंगली होती. शेवटी पंजाबच्या संघाने फायनल बाजी मारली होती. त्याच्यासाठी पंजाब किंग्जच्या संघाने ३.८० कोटी रुपये खर्च केले आहेत.

# बायकोचा हट्ट, पण चहलचा नकार!

## अखेर धनश्री आणि युजवेंद्रच्या घटस्फोटाचे कारण समोर

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेटपटू युजवेंद्र चहल तसेच धनश्री वर्मा घटस्फोट घेत वेगळे झाले आहेत. २० मार्चला धनश्री आणि चहलचा घटस्फोट कोर्टाने मान्य केला. लग्नानंतर चार वर्षांनी या सेलिब्रिटी कपलचा संसार मोडला. धनश्री आणि चहलच्या घटस्फोटाची बातमी ऐकताच चाहत्यांनाही मोठा धक्का बसला होता. आता त्यांच्या घटस्फोटाचे खरे कारण समोर आले.



धनश्री आणि चहलच्या घटस्फोटाला मुंबई कारण ठरल्याचे म्हटले जात आहे. वरिष्ठ पत्रकार विकी लालवानी यांनी दिलेल्या माहितीनुसार धनश्रीने आणि चहल या दोघांच्याही पर्सनालिटी वेगळ्या असल्याने ते फार काळ एकत्र राहू शकणार नव्हते. त्यातच धनश्रीने चहलला हरियाणातून मुंबईला शिफ्ट होण्याचा हट्ट केला होता. चहलने मुंबईत यावे, असे धनश्रीला वाटत होते, मात्र आई-वडिलांना सोडून येण्यासाठी चहल तयार नव्हता.

लग्नानंतर चहल आणि धनश्री युजवेंद्रच्या आई-वडिलांसोबत हरियाणात राहत होते. फक्त कामानिमित्तच ते मुंबईला येत होते, पण यावरूनच त्यांच्यात वाद होत होते. आई-वडिलांना सोडून मुंबईला शिफ्ट होण्यासाठी तयार नसल्याचे चहलने धनश्रीला स्पष्ट सांगितले होते. हेदेखील त्यांच्या घटस्फोटाच्या काही महत्त्वाच्या कारणांपैकी एक होते, असे विकी लालवानी यांनी म्हटले आहे.

धनश्री वर्मा आणि युजवेंद्र चहलने २०२०मध्ये लग्न केले होते, पण घटस्फोटाआधी अनेक महिन्यांपासून ते वेगळे राहत होते, अशी माहिती त्यांनी न्यायालयात सांगितली. याच कारणामुळे चहल आणि धनश्रीच्या घटस्फोटाच्या प्रक्रियेतील सहा महिन्यांचा कुलिंग ऑफ पिरिडदेखील रद्द करत त्यांच्या घटस्फोटावर तातडीने सुनावणी करण्यात आली होती.

# श्रेयस अय्यरचा खास विक्रम

## तीन वेगवेगळ्या फ्रँचायझी संघांकडून अर्धशतक

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल स्पर्धेतील १८व्या हंगामात नव्या पंजाब किंग्ज फ्रँचायझी संघाचे नेतृत्व करताना श्रेयस अय्यरने गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात नाबाद ९७ धावांची खेळी केली आणि संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या खेळीसह श्रेयस अय्यरने एक खास विक्रम आपल्या नावे केला आहे.

पंजाब किंग्ज संघाचे नेतृत्व करण्याआधी श्रेयस अय्यरने गत हंगामात कोलकाता नाईट रायडर्सला जेतेपद मिळवून दिले होते. गत हंगामात दोन वेळा त्याने ५०पेक्षा अधिक धावा केल्या होत्या. याशिवाय २०२०च्या हंगामात दिल्ली कॅपिटल्स संघाचे नेतृत्व करताना त्याच्या भात्यातून अर्धशतक आल्याचे पहायला मिळाले होते. आयपीएलच्या इतिहासातील तो पहिला असा खेळाडू आहे ज्याने तीन वेगवेगळ्या फ्रँचायझीचे नेतृत्व करताना अर्धशतक झळकावले आहे.

श्रेयसशिवाय अजिंक्य रहाणे, कुमार संगकारा, महेला जयवर्धने आणि स्टीव्हा स्मिथ या चार दिग्गजांनी आयपीएलमध्ये तीन वेगवेगळ्या फ्रँचायझी संघाचे नेतृत्व केले आहे, पण यातील कुणालाही श्रेयस अय्यरसारखी कामगिरी करता आलेली नाही. श्रेयसच्या नेतृत्वाखाली दिल्ली संघ फायनलही खेळला होता. त्यानंतर कोलकाता संघाने त्याच्या नेतृत्वाखाली जेतेपद पटकावले. दोन वेगवेगळ्या फ्रँचायझी संघांना फायनलपर्यंत नेणारा तो एकमेव कॅप्टन आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com